
प्रश्न
उपनिषद
मधुकर
सोनवणे

# प्रश्नोपनिषद

## काव्यमय भाष्य

# मधुकर वि. सोनवणे

# प्रश्नोपनिषद

मधुकर वि. सोनवणे

20, विजय नगर कॉलनी
नवा आडगाव नाका पंचवटी नाशिक-3
422003
फ़ोन: ९४२२७५६३३३

**msonavane@hotmail.com**

हे पुस्तक प्रताधिकारमुक्त असून
आपण हे कायदेशीररित्या
कोणालाही विनामूल्य पाठवू
शकता.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २३ ऑगस्ट २०२१ (श्रावण तृतीय सोमवार १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



# अल्प परिचय

मी मधुकर वि.सोनवणे.

रेल्वेत ३६ वर्षे नोकरी करून १९९७ मध्ये नोव्हेंबरमध्ये कोंकण रेल्वेतून डेप्युटी चीफ इंजिनिअर म्हणून सेवानिवृत्त.

लहानपणी वयाचे आठव्या वर्षी ज्ञानेश्वरी जीवनात आली. करपात्री स्वामी, बाळकोबा भावे आदिंनी गीता व ज्ञानेश्वरी यांच्यात खोल जाण्याचा उपदेश केला.

पूर्ण ज्ञानेश्वरी १९७३ मध्ये वाचून झाली १९९१ मध्ये पहिले प्रवचन भुसावळ येथे दिले. नंतर आजवर ६०० च्या वर प्रवचने व जवळ जवळ तेवढेच विविध वृत्तपत्रातून लेखन झाले. ज्ञानेश्वरीचा अभ्यास करीत असतांना १६ व्या अध्यायात श्रुतींचा अभ्यास होणे हे भगवंताच्या गोचर होण्यासाठी आवश्यक सांगितल्याची ओवी वाचल्यावर उपनिषदांच्या अभ्यासाकडे ओढले गेलो.

उपनिषदांचे तत्वज्ञान हे ज्ञान-मार्गावर आधारित आहे. हे तत्वज्ञान जीवनाला कल्याणाचा मार्ग दाखविते.

विविध उपनिषदांचेवर भाष्ये वाचून त्यांचा आशय काव्यात उतरविण्याचा कार्यक्रम सुरु केला आहे.

‘ई साहित्य प्रतिष्ठान’ या प्रख्यात संस्थेने यांत रुचि दाखविल्याने जमेल तेवढ्या उपनिषदांच्या काव्यमय आशयाचे कार्य सुरु केले आहे.

प्रश्नोपनिषद हे अध्यात्माचे सार आहे. विशेषत: पांचवा प्रश्न ॐकाराशी निगडीत आहे.त्यांत महर्षी पिप्पलाद यांनी छान माहिती दिली आहे.

गीता व ज्ञानेश्वरी यांच्यातील आशय आणि उपनिषदांचा अभ्यास करून त्यांचे काव्यमय आशयात्मक भाष्य याला याच प्रकारे प्रकाशित करण्याचे योजिले आहे.

आज तिसऱ्या श्रावण सोमवारी हे लेखन प्रकाशित होत आहे. आपणा सर्वास उर्वरित काल समाधानी जावो. शिव हे आदि गुरु आहेत त्यांना सादर वंदन.

आपणा सर्वांना या उपनिषदाने जीवनात ज्ञानाचा लाभ होवो व जीवन उज्वल होवो. हीच भगवंताला प्रार्थना

**अण्णा**

{मधुकर वि. सोनवणे}

२३/०८/२०२१

तृतीय श्रावणी सोमवार

२०, कल्पतरू, विजयनगर कॉलनी

नवा आडगाव नाका. पंचवटी-नाशिक. 9422756333

# अर्पण पत्रिका

ज्यांनी बालपणापासून ज्ञानेश्वरीची गोडी लावली आणि सोळा सोमवारांचे सारखे व्रत आचरून रामरक्षा, व्यंकटेश स्तोत्र, गुरुचरित्र आदि ग्रंथ व स्तोत्रे म्हणवून घेऊन आंतली प्रगती करविली, अनेक वर्षे ते गीताप्रेस गोरखपूरच्या 'कल्याण' मासिकाचे वर्गणीदार होते. ते माझे वडील कै. विठ्ठलराव राधाकृष्ण सोनवणे यांना व आई श्रीमती भिमाताई वि. सोनवणे यांना हे लेखन समर्पित करीत आहे..



**कै.विठ्ठलराव राधाकृष्ण सोनवणे** {१७-११-१९१५ मृत्यू ०६-०१-१९९३}

**(जन्म –कार्तिक –प्रबोधिनी शु.११ मृत्यू- पौष शु. त्रयोदशी)**

**कै.भिमाताई वि. सोनवणे {१३-०५-१९२२ मृत्यू १७-१२-२०१०}**

**(जन्म- जेष्ठ शुद्ध १२. मृत्यू– मोक्षदा एकादशी}**

जीवनाची घडण बालपणावर बरीचशी अवलंबून असते. बालपणी प्रवचने ऐकण्यासाठी आमच्या आजींच्या बरोबर मला पाठवीत. त्यामुळे गोडी वाढत गेली. माझे आई व वडील दोघांना धार्मिकतेची आवड होती.

माझे अंतरंग घडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

वडिलांनी स्वामी स्वरूपानंद पावस यांना गुरु केले होते. त्यांची अनेक पुस्तके त्यामुळे वाचनात येत राहिली. आईने श्रद्धापूर्वक वडिलांचे नंतर पावसला दर वर्षी देणगी पाठवून कृतज्ञता व्यक्त करणे सोडले नाही.

वडील मॅट्रिक झाल्यावर महसूल खात्यांत कारकून म्हणून लागले आणि खात्याच्या परीक्षा देऊन तहशीलदार व शेवटी डेप्युटी कलेक्टर म्हणून नोव्हेंबर १९७३ मध्ये सेवानिवृत्त झाले.

अत्यंत प्रामाणिक म्हणून त्याचा लौकिक होता. गरिबीत, आहे, त्याच्यात कसे भागवावे हे आम्हाला त्यांच्याकडून शिकता आले.

ज्ञानेश्वरीचे नियमित वाचन त्यांचेमुळे मला बालपणी घडले. त्यांनी दिलेली शिकवण हाच अध्यात्माचा पाया बनला. उभयतांच्या पावन स्मृतीला विनम्र वंदन.

**मधु अण्णा**

**तृतीय सोमवार –श्रावण वद्य प्रतिपदा, २३/०८/२१.**

# प्रश्नोपनिषद - मनोगत

दश उपनिषदात या उपनिषदाला एक वेगळेच महत्व आहे. यांत प्रश्न करणारे, उत्तम वैदिक ज्ञान असलेले व उच्च अध्यात्मिक स्तर गांठलेले मान्यवर ऋषि आहेत. आणि उत्तर देणारे ऋषिवर्य पिप्पलाद हे महान तत्ववेत्ते आहेत.

हे अथर्ववेदातील पिप्पलाद शाखीय ब्राह्मण भागाच्या अंतर्गत आहे. अध्यात्मात रुचि असणाऱ्याला हा ग्रंथ म्हणजे ज्ञानाचा खजिना आहे.

प्रश्न कर्त्यांनी विचारलेले कूट प्रश्न हा आध्यात्मिकदृष्ट्या ज्ञात्यांच्या तर्कनिष्ठ शंका आहेत. ज्या परम तत्त्वातून विश्वाची उभारणी झाली, त्याच्या सखोल ज्ञानावर आधारित असलेले प्रश्न आणि त्याची यथार्थ आणि समर्पक उत्तरे या मार्गावर असलेल्या पथिकांना नक्कीच मार्गदर्शन करतात.

ज्याला अनुभूती आणि ज्ञान पूर्णपणे झालेले आहे, अशा पिप्पलाद ऋषिवर्यांच्या चरणी विनम्र वंदना. हे उपनिषद वाचून, उमगून त्याचा ज्ञात्यांनी जीवनात फायदा करून घ्यावा म्हणून याला काव्यबद्ध करतांना फार कठीण गेले.

आधार भूत ग्रंथ – स्वामी परमार्थानंद यांचे भाष्य, स्वामी विद्यानंद पुणे यांचे उपनिषद बोध, आणि कल्याण मासिकाचा विशेषांक. तसेच सार ग्रहण (मी.पा) तील ‘उपनिषदे’ यातील श्री शरद यांचे लेखन’ सर्व

संबंधितांचा मी आभारी आहे. श्री पद्माकर पाटील –डॉक्टर आर. डी. पाटील { निवृत्त प्राध्यापक अभियांत्रिकी महाविद्यालय शेगाव } यांनी बहुमोल सहाय्य केले. आणि पुढेही ते लाभणार आहे. त्यांचा कृतज्ञ उल्लेख करीत आहे. त्यांच्या सहवासात येण्याने मला तत्वज्ञानाची आवड व अभ्यास असलेला असा स्नेही मुद्दाम परिचय घडवून माऊलीने आणवून दिला. ही माउलीच्या कृपेचे फलित आहे.

माऊलीच्या पाठींब्याने व ई साहित्य प्रतिष्ठान' यांच्या प्रोत्साहनाने हे लेखन पूर्ण झाले. शुद्धता व रेखीवता हे 'प्रतिष्ठान प्रकाशनाचे वैशिष्ट्य आहे.

श्रावणाच्या पावन महिन्यातील सोमवारी याचे प्रकाशन होणे हेही भाग्याची गोष्ट आहे. त्याबद्दल संबंधितांचे आभार.

या महान ज्ञानाने आपला जीवन मार्ग अधिक उज्वल होवो.

हरी ॐ || – अण्णा

# प्रश्न  उपनिषद

# दिव्य आशीर्वाद



## प्रश्न उपनिषद –प्रश्न पहिला

हरि ॐ ||

गुरुदेव ज्ञानेश्वर माऊलीला विनम्र वंदन

*ॐ सुकेशा च भारद्वाजः शैब्यश्च सत्यकामः सौर्यायणी*
*च गार्ग्यः कौसल्यश्च अश्वलायनो भार्गवो वैदर्भिः कबन्धी*
*कात्यायनस्ते हैते ब्रह्मपरा ब्रह्मनिष्ठाः परं*
*ब्रह्मान्वेषमाणाष ह वै तत्सर्वं वक्ष्यतीति ते ह*
*समित्पाणयो भगवन्तं पिप्पलादमुपसन्नाः ॥ १ ॥*

भारद्वाजी कुळी सुकेशा, सत्यकाम तो शिबीकुळीचा |
कोसल देशवासी अश्वलायन, सौर्यायणी तो गर्गांचा || १
विदर्भवासी भार्गव ऋषि तो, कबंधी प्रपौत्र कत्यांचा |
ब्रह्मनिष्ठचि वेदपरायण, ऐसा लौकिक साहींचा || २.
पिप्पलाद हे ख्यातचि ऋषिवर, ब्रह्मनिष्ठ म्हणुनी महती |
समिधा घेऊनी करी आदरे, साही भेटाया जाती || ३.

मनात आदर श्रद्धा भक्ती, उत्कंठा ती ज्ञानाची |

शमनचि प्रश्नांचे ते होईल, महती ती महर्षींची || ४.

परब्रह्म ज्ञानी उत्कंठा, नमन ऋषिवरा ते करिती |

हेतू मनीचा करिती प्रगट ते, विनम्र भावे करुनी स्तुती || ५.

*तान् ह स ऋषिरुवाच भूय एव तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया*

*संवत्सरं संवत्स्यथ यथाकामं प्रश्नान् पृच्छत यदि*

*विज्ञास्यामः सर्वं ह वो वक्ष्याम इति ॥ २*

**गुरुवर्य जरी ज्ञानबंत ते, पाही पात्रता शिष्यांची |**

**म्हणुनि सांगती रहा आश्रमी, मुदत दिली ती वर्षाची || ६.**

**येथील नियमा करणे पालन, ब्रह्मचारी आचरणाची |**

**सुयोग्यता ज्ञानार्जन करण्या, तेणे होईल निश्चितची || ७.**

**आकलनाचा स्तर उंचावे, सहजी तेणे शुद्धीने |**

**उच्च ज्ञान जे श्रुतितुनी लाभे, कृतीत येईल आचरणे || ८.**

**एक वर्ष ही पूर्व तयारी, जाणुनि होणे ज्ञानाची |**

**कांही उत्तरे मनी उकलतील, ऋषिवरांना पुसण्याची || ९.**

**सुपात्राशीचि बोध करावा, दंडक असतो जो श्रुतीचा |**

**तोही पाळला जाईल निश्चित, ऐसा मानस गुरुजींचा || १०.**

*अथ कबन्धी कात्यायन उपेत्य पप्रच्छ ।*

*भगवन् कुतो ह वा इमाः प्रजाः प्रजायन्त इति ॥ ३ ॥*

प्रश्न पुसाया जेही गेले, उत्कंठा त्या बोधाची |
निष्ठेने ते नियमा पाळुनी, मुदत संपता वर्षाची || ११.
विनम्रभावे कात्यायन तो, वंदन करीतो गुरुजींशी |
म्हणे सांगणे भगवन् आता, उकलावे मम प्रश्नाशी || १२.
विश्वामाजी सजीव अनेकचि, अविरत येती नि जाती |
कोण असे या सकला कारण, उत्पत्ती लय आणि स्थिती ?|| १३.
सृष्टी ही जी मम भंवताली, कोण कोठुनी येत असे ?|
काय प्रयोजन असे तयाशी, आणि कोण शक्ती ती करवितसे?||१४.
प्रत्येकाचे कार्य वेगळे, इहलोकी ना त्या गणती |
अविरत चालती व्यापारांचे, गाडे नित्यचि या जगती || १५.
अव्यक्तातुनी जगती येती, करिती आपुल्या कार्याला |
आणि विरुनिया सहजी जाती, काय प्रयोजन असे याला ?|| १६.

जगतीचे विद्वान किती तरी, सांगती जे हाती आले |

परि कुणा ना निश्चित माहित, असंख्य वाद जरि झाले.|| १७.

भगवन् आपण विषद करावे, उत्तर माझ्या प्रश्नांचे |

आपण ज्ञानी वंदन आपणा, उकल करावे ते यांचे || १८.

*तस्मै स होवाच प्रजाकामो वै प्रजापतिः*

*स तपोऽतप्यत स तपस्तप्त्वा स मिथुनमुत्पादयते ।*

*रयिं च प्राणं च इति, एतौ मे बहुधा प्रजाः करिष्यत इति ॥ ४ ॥*

**पिप्पलाद ऋषि श्रीगुरु आता, देती उत्तर ते यांचे |**

**प्रसिद्ध आहे वेदामाजी, मनी आले प्रजापतीचे || १९.**

**इहलोकी या सृष्टी व्हावी, संकल्पे तप सुरु केले |**

**त्यास्तव ब्रह्मा निर्मियला, नि आदेश तैसेची दिधले || २०.**

**सृष्टी निर्मिण्यासाठी सृजियली, जोडी रयि नि प्राणाची |**

**उभय मिळोनी, प्रजा निर्मिती, जड आणि ती सजीवांची || २१.**

**सूक्ष्म शरीर नि प्राण नि मनही, शब्द 'प्राण' तो दर्शवितो |**

**'रयी' शब्दाने भोज्य' दर्शवी, 'मूर्तचि' तो जे-जे होतो || २२.**

**प्राण असे तो सूर्य जयाने, प्राण-शक्ती लाभे आपणा |**

**रयी असे तो सौम्य चंद्रमा, साह्य करी पोषण-भरणा || २३.**

**चक्र पाप-पुण्याचे सुख-दुःखे, कल्पनेतल्या क्रीडेचे |**

**जग मायावी, गुंतण्याशी जीव, फेरे ते भव-चक्राचे || २४.**

हेतू कर्माचे ते सहजी, फल-प्राप्तीच्या योगाने |
जीवन-रेखा घडेल सहजी, आपआपल्या कर्माने || २५.

जसे कर्म ती तशीच योनि, सत्कर्मे लाभे मुक्ती |
विवेक वैराग्या अनुसरता, प्रसन्नता शांती प्राप्ती || २६.

*आदित्यो ह वै प्राणो रयिरेव चन्द्रमा रयिर्वा एतत्*

*सर्वं, यन्मूर्तं च अमूर्तं च तस्मान्मूर्तिरेव रयिः ॥ ५ ॥*

**सूर्यचि-प्राण असे सकलांचा, जगण्याची जीचि शक्ती |**

**चंद्रचि आहे स्वामी मनाचा, समजे तो होता व्यक्ती || २७.**

**शास्त्रे म्हणती, द्रव्य नि उर्जा, श्रुति म्हणे प्राण नि रयी |**

**आवश्यक ते जीवन आधारा, पूरक एक-दुज्या उभयी || २८.**

*अथादित्य उदयन् यत् प्राचीं दिशं प्रविशति तेन प्राच्यान्*
*प्राणान् रश्मिषु सन्निधत्ते । यद्दक्षिणां यत् प्रतीचीं*
*यदुदीचीं यद् अधो यद् ऊर्ध्वं यदन्तरा दिशो यत्*
*सर्वं प्रकाशयति तेन सर्वान् प्राणान् रश्मिषु सन्निधत्ते ॥ ६ ॥*

**पूर्व दिशेला आदित्य येता, प्राण-तत्व आच्छादि जगी |**
**सकल दिशा त्या उज्वल करितो, चैतन्यचि जागोजागी || २९.**

*स एष वैश्वानरो विश्वरुपः प्राणोऽग्निरुदयते ।*

*तद् एतद् ऋचाऽभ्युक्तम् ॥ ७ ॥*

**वैश्वानर तो अग्निरुपाने, क्षुधारूपे पोषणा करी |**

**प्रकाशातुनी देत चेतना, आणि जीवन साकारी || ३०.**

*विश्वरूपं हरिणं जातवेदसं परायणं ज्योतिरेकं तपन्तम् ।*

*सहस्ररश्मिः शतधा वर्तमानः प्राणः प्रजानामुदयत्येष सूर्यः॥८॥*

**सहस्त्र बाहूंनी तो आपुल्या, सकलांना वेढुनि घेई |**

**एकटाची तो जीवन उर्जा, परि सकलाशी तो देई || ३१.**

**आपुल्या किरणाच्या उष्म्याने, शुद्धची जल ते सिंधूचे |**

**वर्षाकाली तृषा धरतीची, दान देई पर्जन्याचे || ३२.**

**आरोग्याची घेई काळजी, भूमीवरल्या उष्म्याने |**

**आधार जीवनाचा ती होती, सूर्याची वत्सल किरणे || ३३.**

*संवत्सरो वै प्रजापतिः तस्यायने दक्षिणं चोत्तरं च ।*

*तद्ये ह वै तदिष्टापूर्ते कृतमित्युपासते ते चान्द्रमसमेव*

*लोकमभिजयन्ते । त एव पुनरावर्तन्ते तस्मादेत ऋषयः*

*प्रजाकामा दक्षिणं प्रतिपद्यन्ते । एष ह वै रयिर्यः पितृयाणः॥१॥*

**प्रवाह काळाचा हा चाले, वर्षाचे बारा महिने |**

**संवत्सर हा कालरूपाने, अविरत पुढेचि तो जेणे || ३४**

**दक्षिण आणि उत्तर ऐशी, दोन तयाची ती अयने |**

**इष्ट कामना धरुनी मानसी, चंद्रलोकी जाणे येणे || ३५.**

**पितृयान या मार्गा संज्ञा, 'रयी' ऐसे त्याशी म्हणणे |**

**मार्ग दक्षिणेचा तो असता, पुनःपुन्हा येथे येणे || ३६.**

**आशीर्वाद ते प्राणरूपाने, सूर्य देवता देत असे |**

**आणि 'रयी' ती चंद्ररूपाने, सृष्टीत काले वर्ततसे || ३७.**

**अमृत वर्षे सोम रसे ते, सौम्यचि चंद्राची किरणे |**

**औषधी वनस्पतीतुनी लाभे, आरोग्य सकलाशी जेणे || ३८.**

**सूर्य असे तो जीवनी भोक्ता, आणि भोग्य चंद्रमा तसा |**

**उर्जा सूर्ये, कार्यालागी, त्याचाचि घेतला वसा || ३९.**

वनस्पतींना वर्धन चंद्रे, जेणे निर्मिती अन्नाची |

सूर्य देतसे देही क्षमता, जीवनात उपभोगाची || ४०.

उदय नि अस्ते दिवस-रात्र ती, सूर्य देतसे कालगती |

काल-प्रवाहा सूर्यचि कारण, काल जनक त्याची ख्याती || ४१.

तिथी पक्ष नि महिना विकसे, येणे-जाणे चंद्राचे |

तोही साह्या कालप्रवाहा, जनकत्वहि ते उभयांचे || ४२.

अयने बदले मार्ग रवीचा, उत्तर आणि दक्षिणही |

बदले अध्यात्माची साधना, अंत्य समय ती गती पाही || ४३.

भारतीय संस्कृती दर्शना, उकल ती प्रश्ने या होई |

अयने सूचक जीवन हेतू, प्रगटे जो काला-ठायी || ४४.

सृष्टीत या ना कांही जन्मे आणि लयाला ते जाई |

कालप्रवाही नित्य वाटते, आले जन्मा गेलेही || ४५.

बीज सृजितसे विशाल वृक्षी, तो चि बिजाते प्रसवितसे |

चक्र अविरत चालत राही, त्याशी कदापि खंड नसे || ४६.

विश्व चळतसे सूर्य रूपाने, उत्पत्ती स्थिती आणि लये |

जलधारांनी चाले जीवन, चक्र चालवी सूर्य तये || ४७.

जीवनदाता सूर्य असे तो, प्राणांचाही प्राण असे |
प्रकाश, उर्जा, सहाय्य अन्ना, सूर्यदेवची घडवितसे || ४८.

सगुण रूपे सूर्यदेवता, निर्गुण खेळवी ऊर्जेला |
देहधारणा, ज्ञान वर्धना रविकिरणे उपयोगाला || ४९.

कार्यशक्ती नि जीवनाधारा, सूर्य देवता साह्याला |
सकल शक्तीचा तो उद्गाता, ब्रह्म सगुणचि विश्वाला || ५०.

संवत्सर जो काल-प्रवाहे, तोचि असे श्रीप्रजापती |
चंद्रलोकी ते जाणे येणे, दक्षिणायानी तशी गती || ५१.

देह सोडिता अतृप्त असता, पितृलोकी जाणे अंती |
परी जयाला पूर्ण विरक्ती, उत्तरायणी हो मुक्ती || ५२.

खुंटे त्याचे जाणे येणे, समरसता ब्रह्मी होई |
व्यष्टी म्हणुनि नसे व्यक्तता, विश्व-रुपेचि तो राही || ५३.

उत्तरायणी सूर्ये असता, दिनमानहि ते अधिक असे |
ज्ञान-प्रकाशन ते अध्यात्मी, उत्तर अयनी वर्धतसे || ५४.

दक्षिणायनी रात्र मोठीचि, प्रकाशाहुनी अधिक अशी |
अज्ञानाचे वर्धन तेंव्हा, अध्यात्मी दक्षिणी तशी || ५५.

लौकिक अयने कांही असो जरि, प्रकाश जीवनी वाढतसे |
अज्ञानाची निशा मिटतसे, तैसीची गती होत असे || ५६.

म्हणुनि दिन, पक्ष नि अयनी, पंचांगी कांहीही असता |
उत्तमचि गती त्याला लाभे, जीवनांती ती उज्वलता || ५७.

शुद्ध जयाचे नित्य आचरण, शुक्ल पक्ष नि दिवस असे |
अपरा विद्या हीच असे ती अज्ञानाचे नांव नसे || ५८.

परहितसाधन हेची जीवन शुक्लची मार्गा दावितसे |
इहलोकी ना परलोकी ही, उज्वलता अस्तित्वी असे || ५९.

शुद्ध आचरणी अग्नि पूजन, वाट असे मांगल्याची |
चिंता नाही निशा-पक्ष वा कवणा अंती अयनाची || ६०.

*अथोत्तरेण तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया विद्यया आत्मानं अन्विष्य आदित्यं अभिजयन्ते।*

*एतद्वै प्राणानां आयतनं एतद् अमृतं अभयं एतत् परायणंएतस्मान्न पुनरावर्तन्त इत्येष निरोधस्तदेष श्लोकः ॥ १० ॥*

ब्रह्मचर्य पाळुनी तप करी, अध्यात्महि ते श्रद्धेने |
देह-भावना पूर्ण त्यागुनी, ब्रह्म शोधिती ज्ञानाने || ६१.

कोण असे मी? वेध घेत ते, शुद्ध अशा आचरणाने |
जीवन ज्यांचे सदाची उज्वल, अंती प्रकाशमार्गाने || ६२.

सूर्य लोकी ते निश्चित जाती, ब्रह्म-प्राप्ती त्या आपैसी |
शुद्ध नि परहित असेचि आचरण, तेजोमय त्या मार्गाशी || ६३.

तन मन आणि प्राणसहितहि, निरलस प्रयास होय तपे |
ब्रह्मचर्य ते पाळिती पुरते, सकला पाही हरिरूपे || ६४.

कुणासही ना दुःख मजमुळे, ऐशी ब्रह्मचर्य वृत्ती |
जेही करिती शुद्ध मनाने, कर्मी नसेचि आसक्ती || ६५.

विषयी सेवन संयम पाळुनी, वाट्या सहजी जे आले |
उचितचि मार्गे, पार करिती त्या, आणि ईश्वरा अर्पियले || ६६.

काम सेवनी संभोगाने, अन्या तृप्ती साधितसे |
ज्या करणे ते सहजी घडावे आसक्ती लवलेश नसे || ६७.

ऐशा उचितचि कामपूर्तीने, ब्रह्चर्य साधे पुरते |
आणि श्रद्धा नितांत असणे, देतचि ब्रह्मप्राप्तीते || ६८.

ऐशा रितीने तप नि ब्रह्मचर्य, श्रद्धा देई ज्ञानाते |
प्राणतत्व ते भास्कर योगे, निश्चित योजी मुक्तीते || ६९.

*पञ्चपादं पितरं द्वादशाकृतिं दिव आहुः परे अर्धे पुरीषिणम् ।*
*अथेमे अन्य उ परे विचक्षणं सप्तचक्रे षडर आहुरर्पितमिति॥११ ॥*

एकचि शिशीर-हेमंता धरुनी, पांच पाऊले त्या असती |
बारा महिने अवयव त्याचे, ऐसा असे प्रजापती || ७०.
श्रुति म्हणते त्या 'पितर'चि सूर्या, तोचि ब्रह्म नि प्रजापती |
तो चि कार्यरत नित्य असे ज्या, काल म्हणोनी ती ख्याती || ७१.
पेय जलाचा तो निर्माता, पिता असे तो सकलांचा |
अन्य म्हणती स्वर्गाहुनी उंचचि, रथात ऐसे काळाचा || ७२.
रथास त्याच्या सात अश्व कि, सात वार सप्ताहाचे |
सहा ऋतूंचे सहाहि आरे, असती त्याच्या चक्राचे || ७३.
त्याला ज्ञानहि ते सकलांचे, गतिमान तो नित्य असे |
'संवत्सर सृष्टी' हि म्हणती, ब्रह्म सगुण सकलास दिसे || ७४

*मासो वै प्रजापतिः तस्य कृष्णपक्ष एव रयिः शुक्लः प्राणः तस्मादेतद् ऋषयः शुक्ल इष्टिं कुर्वन्ति इतर इतरस्मिन् ॥ १२ ॥*

**महिना हाहि काळ असे तो, कृष्ण पक्ष त्यांतील रयी |**
**शुक्ल पक्ष निष्कामी प्राण तो, शुभ कार्ये ती त्याठायी || ७५**
**कृष्ण पक्षी ती सकाम कर्मे, निष्कामचि ते शुक्लीचे |**
**कृष्णे भौतिक भोगरूपाचे, तेचि दक्षिण अंगाचे || ७६.**
**कोणताही तो पक्ष अयनहि नित्य करी जो शुभ कर्मे |**
**उत्तम गती ती त्याची निश्चित, काल कोणताहि असो नामे || ७७**

*अहोरात्रो वै प्रजापतिः तस्याहरेव प्राणो रात्रिरेव रयिः*

*प्राणं वा एते प्रस्कन्दन्ति ये दिवा रत्या संयुज्यन्ते*

*ब्रह्मचर्यमेव तद्, यद् रात्रौ रत्या संयुज्यन्ते ॥ १३ ॥*

**चक्र असे हे दिवस-रात्रीचे अविरत ऐसे ते चाले |**

**कार्य हेतूने ठरते फल ते, शुक्ल-कृष्ण म्हणती बोले || ७८.**

**उभयहि पावन काल प्रजापती, शुभ नि अशुभही कांही नसे |**

**नित्यचि जो निष्काम आचरे, गती उत्तमचि त्यास असे || ७९.**

**कालरूपाने स्वयेचि ईश्वर, म्हणुनि सत्कर्मी आस्था |**

**मनुष्य जन्महि दुर्लभ म्हणुनि, नित्यचि करणे सत्कृत्या || ८०.**

**नित्य प्रकाशी प्राण-तत्व ते, मांगल्ये वरी दिवसाला |**

**आणि रयी ती रात्र मानिली सूर्यचि गगनी नसण्याला || ८१.**

**परि शुभ कर्मा काल न बंधन, कारण मार्ग उजेडाचा |**

**परहित आणि सत्कर्मासी प्रतिक्षण आहे मोलाचा || ८२.**

**रात्री खाणे अल्प असावे, मिताहार बहु उपयोगी |**

**आसक्ती न कवणे काळीही, तरीच तो उत्तम योगी || ८३.**

*अन्नं वै प्रजापतिः ततो ह वै तद् रेतः*

*तस्मादिमाः प्रजाः प्रजायन्त इति ॥ १४ ॥*

**अन्नहि जाणे प्रजापती तो, प्रजोत्पत्ती संभवे तये |**

**शास्त्राधारे नित्य आचरण ‘रयी’ शुभचि वर्तणे जये || ८४.**

**पुत्र कि कन्या दोन्ही उत्तम, प्रसादचि भगवंताचा |**

**उभयहि साकारिती जगताला, भेद नसो तो संततीचा || ८५**

*तद्ये ह वै तत् प्रजापतिव्रतं चरन्ति ते मिथुनमुत्पादयन्ते ।*

*तेषामेवैष ब्रह्मलोको येषां तपो ब्रह्मचर्यं येषु सत्यं प्रतिष्ठितम्॥१५॥*

**जीवन सत्कर्मेचि आचरी, प्रजापतीची तीच पुजा |**

**ब्रह्मलोकीची प्राप्ती तेणे, स्वधर्म यज्ञचि तो समजा || ८६.**

**ब्रह्मचर्य व्रत नित्य पाळणे, उत्तम संस्कारा द्यावे |**

**सार्थक जन्मी याच करावे, आदर्श जीवनी आचरावे || ८७.**

**स्वधर्म पालन शात्राधारे, उपासना ही श्रेष्ठ असे |**

**सार्थक करणे या जन्माचे, याहुनि श्रेष्ठ कांहीच नसे || ८८.**

## *तेषामसौ विरजो ब्रह्मलोको न येषु जिह्ममनृतं न माया चेति॥१६॥*

असत्याशी ना कदापि थारा, आचरणी नि वाणीने |
कुटीलतेचा ना लवलेशहि, ब्रह्मपदी तो खात्रीने || ८९.

पहिल्या ऋषि कात्यायन यांनी, प्रश्न महार्षिना पुसिले |
सृष्टी-कार्या विषद जाहले, समाधान ऋषीला झाले || ९०.

पिप्पलाद ऋषि स्पष्ट सांगती, कृष्ण-शुक्ल या उभय गती |
स्पष्टचि त्याचे यथार्थ ज्ञाने, सांगितली तेजो महती || ९१.

दुर्लभ हा नर देह लाभला, दिशा दावी कैवल्याची |
कसे टळावे भव-चक्र नि फेरे, महती ज्ञेयचि ज्ञानाची || ९२.

शुक्ल-कृष्ण या गती ना बघणे, निष्कामची त्या कर्माने |
देह त्यागिता, पुढील प्रवासी, वर्तन कैसे द्वैताने ?|| ९३.

वावरुनि द्वैतात नि:संगे, अद्वैती कैसे जाणे |
चित्त शुद्धी, निष्काम वर्तता, कैसे पैलतीरी येणे || ९४.

आत्मा निश्चल म्हणुनि साधन, देहाचे ते योग्यरित्या |
उत्तम होता जुळणी ऐशी, जीवन अनुसरते सत्या || ९५.

शिव-शक्तिच्या उचित सुयोगे, मांगल्यची ती वर्षा |

अस्तित्वाचे कल्याणचि ते, नसेचि सीमा त्या हर्षा || ९६.

**प्रथम प्रश्न संपला**

# द्वितीय प्रश्न

*अथ हैनं भार्गवो वैदर्भिः पप्रच्छ ।*

*भगवन् कत्येव देवाः प्रजां दिधारयन्ते ?*

*कतर एतत् प्रकशयन्ते ?*

*कः पुनरेषां वरिष्ठ इति ॥ १ ॥*

*तस्मै स होवाच - आकाशो ह वा एष देवो वायुरग्निरापः*

*पृथिवी वाङ्मनश्चक्षुः श्रोत्रं च ।*

*ते प्रकाश्याभिवदन्ति। वयं एतद्बाणमवष्टभ्य विधारयामः॥२॥*

उत्तर ऐकुनी समाधान मनी, भार्गव विदर्भ देशीचे |

वंदन करुनी महर्षीलागी, उत्तर इच्छिती, प्रश्नांचे || १.

इहलोकी या प्रजा असंख्यचि, कोण धारिती सकलांना ?|

दिव्य देवता-माजी त्यांतील, भगवन् ते श्रेष्ठत्व कुणा?|| २.

स्थूल- सूक्ष्म नि कारण देहही, अनात्माचि ते नित असती |

उचित सुयोगे, सूक्ष्म शरीरा, कल्याणाची हो प्राप्ती ||३.

सुषुप्तीत ती सकल इंदिये, पूर्ण तया सुप्तचि असती |

एकच जागृत प्राण-तत्व ते, अनुभवते सुखमय स्थिती || ४.

प्राण एकला देह-प्रबंधा, राखितसे ती योग्य स्थिती |
पंचप्राण ते देह व्यवस्था, नित्यचि सुरळित चालविती || ५.

प्राणाद्वारे देह क्रिया त्या चैतन्याच्या नित योगे |
जीवनी अस्तित्वास राखिती, प्राणाच्याची संयोगे || ६.

प्राण असे तोवरती प्राणी, कार्य जगती या चालविती |
म्हणुनि प्राणचि श्रेष्ठ असे तो, ऐसी सहजी ती ख्याती || ७.

प्राण असे तो नित्यची पावन, जेणे व्यक्तित्वा महती |
पंचप्राण ते विविधचि कार्ये, देहाकरवी करविती || ८.

देहाद्वारे संधी लाभे, विश्व-कार्य ते करण्याला |
आणि ओळख निज-रुपाची, ब्रह्माशी ते मिळण्याला || ९.

प्राण-तत्व ते नित्य निरंतर, सूक्ष्म जीव वा गजहि असे |
आदर करणे त्या तत्वाचा, शिवचि त्यांतहि नित्य वसे || १०.

सांगती पिप्पलाद महर्षी, वत्सा, आधार गगनाचा |
त्यातुनि उद्भव वायू अग्नि जल, आणि असे तो पृथ्वीचा || ११.

पांच भुते ही, धारिती देहा, पांच इंद्रिये करणांचा |
त्वचा, नेत्र नि श्रवण नासिका, ज्ञान ग्रहणी त्या जिंव्हेचा || १२

पांची इंदिये विषय वेगळे, ज्ञान मनाला ते देती |

तेणे देहा होत प्रकाशक, श्रेष्ठत्वा आले पुढती || १३.

कथा असे ही श्रेष्ठत्वाची, बृहद्अरण्यकी, छांदोग्यी |

सकल इंद्रियी श्रेष्ठ कोण ते, देहास्तव जे सहयोगी || १४.

एक एक इंद्रियास जाणे, एक वर्ष देहामधुनी |

कळेल महती श्रेष्ठत्वाची, कोण श्रेष्ठ ते त्यामधुनी || १५.

चक्षू जाता, अंध होतसे, परि ना थांबे जीवन ते |

जाता श्रवणही ऐकू येईना, जीवन तरीही ना अडते || १६.

ऐसे एक एक ते जाता, जीवन कठीणचि परि चाले |

आणि प्राण ते जाऊ पाहता, पुढील श्लोकी ते घडले || १७.

*तान् वरिष्ठः प्राण उवाच । मा मोहमापद्यथ । अहं एवैतत् पञ्चधाऽऽत्मानं प्रविभज्य एतद् बाणमवष्टभ्य विधारयामीति । तेऽश्रद्दधाना बभूवुः ॥ ३ ॥*

*सोऽभिमानाद् ऊर्ध्वं उत्क्रामत इव तस्मिन् उत्क्रामति अथ इतरे सर्व एव उत्क्रामन्ते तस्मिंश्च प्रतिष्ठमाने सर्व एव प्रातिष्ठन्ते । तद्यथा मक्षिका मधुकरराजानं उत्क्रामन्तं सर्व एव उत्क्रामन्ते तस्मिंश्च प्रतिष्ठमाने सर्वा एव प्रातिष्टन्ते एवं वाङ्मनश्चक्षुः श्रोत्रं च ते प्रीताः प्राणं स्तुन्वन्ति ॥ ४*

**श्रेष्ठ इंद्रिया माजी प्राण तो, सकलांना तेंव्हा सांगे |**

**महत्व तुमचे अवश्य आहे, विशिष्ट कार्यी ते अंगे || १८.**

**समजू नका तुम्हि अत्यावश्यक, मजचि मुळे जीवन चाले |**

**मुख्यचि मी आधार तनुला, तुम्हा बळाशी मी दिधले || १९.**

**परि तो हेका श्रेष्ठत्वाचा, जेंव्हा अन्यहि सोडीना |**

**निघू पाहता देहापासुनी, झाली देहाची दैना || २०.**

**कासावीसचि सर्व जाहले, एक क्षणही वाटे मोठा |**

**कसल्या गप्पा त्या वर्षाच्या, क्षणात सोडिती तो ताठा || २१.**

मधुमक्षिका मुख्य असे जी, राणी मक्षिका ती उडता |
इतरही साऱ्या सहजी उडती, राणी जेंव्हा ती जाता || २२.

तशी इंद्रिये सहजी त्यागी, तिच्या मागुती देहाला |
प्राणाविन न अर्थ तयाशी, सहजचि हे प्रत्येकाला || २३.

महत्व आपुले जाणे प्राणही, परी नसेची गर्व तया |
विनवू लागले ते प्राणाशी, मुळीच सोडू नको काया || २४.

शक्ती स्त्रोत तूं आमुच्या कार्या, गर्वही गेला तो आमुचा |
तूचि श्रेष्ठ हे सहजी पटले, नको विचारहि जाण्याचा || २५.

फुका गर्व तो आम्हास होता, सोडिले न तूं विनयाशी |
सर्वश्रेष्ठ तूं आपुल्यामाजी, आता कळले आम्हाशी || २६.

प्राण म्हणे त्या, श्रेष्ठ कनिष्ठ हि, नसेची मजला ती भ्रांती |
सुयोग्य करणे कार्यी नेमिल्या, ईश्वरचि आपुली शक्ती || २७.

हे समजावे तुम्हा म्हणोनी, चुणूक दाविली विरहाची |
जोवरी आपण आहो देही, हवी काळजी देहाची || २८.

कार्य जेही नेमिले ईश्वरे, त्या आदेशे वर्तावे |
विना अहंता, श्रेष्ठत्वाची, कार्या अनुकूल ते व्हावे || २९.

मी सकलाशी जोडुनी राहे, नेमियले ते कार्य करी |

अस्तित्वा आधार आपुला, कदापिही हे ना विसरी || ३०.

पांच भागी मी मला वाटुनी, कार्य चालवी देहाचे |

शक्ती पर्याप्तचि देतसे, भान नित्य ते कार्यांचे || ३१.

प्राण, अपान, उदान, व्यान नि, समान हि माझे असती |

प्रत्येकाचे कार्य वेगळे, तोल-ताल राखे शक्ती || ३२.

आरोग्याची घेत काळजी, सकला मीचि सांवरतो |

हवे घेऊनी, नको टाकुनी, क्रमा आपुल्या आचरतो || ३३.

आपुल्या जागी प्राण स्थिरावे, सहजी इतरहि ते वसती |

प्राण प्रमुखचि देहामाजी, कळले मिटली ती भ्रांती || ३४.

देह सोडिता प्राणामागे, इतर इंद्रिये ती जाती |

मधु मक्षिका राणी जेथे, इतर तियेला अनुसरती || ३५.

सकल इंद्रिये प्रणाम करिती, विनयेचि ते प्राणाते |

करिती स्तुतीला, महत्व जाणुनि, पूर्ण सोडीती गर्वांते || ३६.

*एषोऽग्निस्तपत्येष सूर्य एष पर्जन्यो मघवानेष वायुः*

*एष पृथिवी रयिर्देवः सदसच्चामृतं च यत् ॥ ५ ॥*

**इंद्रियेहि ती सकलचि म्हणती, प्राण तप्त हा अग्निरूपे |**

**म्हणुनि प्रभाती, अग्निवंदना, तोचि उर्जा सुर्यरूपे || ३७.**

**रयी असे ती चंद्र देवता, अमृत वर्षा सकलाशी |**

**पोषण आणि आरोग्य देई, किरण मागुनी सूर्याशी || ३८.**

**तैसे रयी ते वायू पृथ्वी, प्राणचि मेघ, नि इंद्र असे |**

**चालविती ते सजीवा सकला, ईश्वर आदेश देई तसे || ३९.**

*अरा इव रथनाभौ प्राणे सर्वं प्रतिष्ठितम् ।*

*ऋचो यजूँषि सामानि यज्ञः क्षत्रं ब्रह्म च ॥ ६ ॥*

**आधार प्राणचि सकल जीवना, आरा तो नाभीस्थानी |**

**जीवनरथ तो सुलभ चालतो, चक्र फिरे  साऱ्या मिळुनी || ४०.**

**विविध कार्यी ती शक्ती वेगळी, प्राण शक्तीचि बळ त्यांचे |**

**ऋग्,यजु आणि सामवेदही, क्षत्रिय ब्राह्मण सकलांचे || ४१.**

*प्रजापतिश्चरसि गर्भे त्वमेव प्रतिजायसे ।*

*तुभ्यं प्राण प्रजास्त्विमा बलिं हरन्ति यः प्राणैः प्रतितिष्ठसि॥७॥*

प्राणदेवते, प्रजापती तूं, गर्भे जन्माला येशी |

मायबापही तूचि होऊनि, देहा घालिशी जन्माशी || ४२.

दिव्य ज्योती ज्या ग्रहताऱ्यांच्या, अंतराळी करिती भ्रमणा |

गती-गुण नि ती तेजोमयता, जशी नेमिली फिरतांना || ४३.

प्रसृत करिती तेजोलहारी, धरतीवर त्या येतांना |

वाढविती त्या तेजगुणांना, परस्परांना मिळतांना || ४४ .

तेज विलक्षण ब्रह्मांडाचे, प्राणतत्व ते बलदायी |

वातावरणी येथे येता, मिश्रण ते ठायीठायी || ४५.

असे तत्व ते ब्रह्मांडाचे ईश्वर निर्मित तूं घेशी |

श्वासाद्वारे अशी दिव्यता, देही सहजी खेळविशी || ४६.

तेजाचे हे सार निरंतर, अनायास ते आम्हाला |

अनंतातुनी जीवास देशी, कृतज्ञ भावे नमन तुला || ४७.

सकल जीवही बहु आदरे, तुज देती ते सन्मान |

अपान सहिते देह खेळवी, आधार देशी तू प्राण || ४८.

सकल जीव ते पुजिती तुजला, प्रतिष्ठीत पांचही भागी |
सृजन होई ते, तुझ्यामुळेचि, योग्य शक्ती त्या-त्या जागी || ४९.

विविध योनीचे सूत्र चालविशी, सूत्रात्मा म्हणती तुजला |
कार्य शक्ती तूं सकला देशी, जगती कार्ये करण्याला || ५०.

नेमियल्या कार्या ज्या देहा, तैसी देऊनी जगताला |
प्रेरक सर्वचि कृती करविशी, देऊनी स्फूर्ती देहाला || ५१

ज्याला जे-जे आवश्यक ते, खाद्यहि तसले पुरविशी |
तृणापासुनि गजराजाच्या, अस्तित्वा तू चालविशी || ५२.

ज्ञान इंद्रिये विषयी विचरता, नेमिली ती कार्ये करिती |
एक दुज्याच्या सहयोगाने, जग चाले ही तंव महती || ५३.

खाद्य पचवुनी देही विविध हा, यज्ञ तूचि तो करविशी |
पूजाचि ही तर भगवंताची, करवुनी असंख्य कार्याशी || ५४.

*देवानामसि वह्नितमः पितॄणां प्रथमा स्वधा ।*

*ऋषीणां चरितं सत्यं अथर्वाङ्गिरसामसि ॥ ८ ॥*

**विविध देवता, देही शक्ती, यज्ञ कराया जठराग्नी |**

**तूचि अग्नी तो, हवी पोचवी, यज्ञातील तूं अहर्निशी || ५५.**

**अखंड यज्ञा चालविणारा, पवित्र अग्नी तूं असशी |**

**त्या अग्नितुनी देवा तुष्टी, बल येई ते कार्याशी || ५६.**

**पितृ-ऋणास्तव तर्पण देण्या, अग्नी पावन तूचि असे |**

**श्रेष्ठ ऋषींच्या आचरणातील सत्यत्वहि ते तूं तैसे || ५७**

**तेणे फिटते पितृ-ऋण ते, कृतज्ञता ती व्यक्तवुनी |**

**आशीर्वाद लाभता तयांचे, सद्भावचि येती जीवनी || ५८.**

**असा वारसा पुढती चाले, धर्म संस्कृती टिकवोनी |**

**धर्माचेहि होई रक्षण, सात्विकता ती वर्धूनी || ५९.**

**जाणकार जे ऋषि तयांना, तपोबलाने जे कळले |**

**ज्ञान इंद्रिया ठायी ऋषी ते, ज्या योगे जीवन चाले || ६०.**

**अंगीरस ते ज्ञान इंद्रिये, जीवन रस देती अंगी |**

**प्राणाद्वारे घडविती जीवन, येई सुखमयाता ती जगी || ६१.**

प्रत्येकाचे जीवन ऐसे, वाढवुनी संपन्न करी |

प्राण देवते, तुझिया योगे, जीवन उत्तम साकारी || ६२.

*इन्द्रस्त्वं प्राण तेजसा रुद्रोऽसि परिरक्षिता ।*

*त्वमन्तरिक्षे चरसि सूर्यस्त्वं ज्योतिषां पतिः ॥ ९ ॥*

**तेजाने संपन्न इंद्र तो, विष्णू ही पालन कर्ता |**

**जीर्णा काढुनि नित्य नूतने, रुद्र तूचि होशी जगता || ६३.**

**अंतरिक्षी तंव नित्य भ्रमण ते, सूर्य देत तेजोमयता |**

**श्रेष्ठ असे ते दैवी तत्व तूं, जीवनाशी तूची त्राता || ६४.**

**कर्म योग घडतसे तुजमुळे, अपरा विद्या योगाने |**

**प्रगत परा विद्येस लाभवी, ज्ञान योग तो अनुसरणे || ६५.**

**प्रत्येकाची ज्ञान इंद्रिये, वेगवेगळ्या क्षमतेची |**

**जसे नेमिले कार्य ईश्वरे, आकलन शक्ती असे त्याची || ६६.**

*यदा त्वमभिवर्षसि अथेमाः प्राण ते प्रजाः ।*

*आनन्दरूपास्तिष्ठन्ति कामायान्नं भविष्यतीति ॥ १० ॥*

**प्राण देवता सूर्य होऊनि, वर्षवी शुद्ध जले धरती |**

**तृष्णा आणि अन्न निर्मिती, तये धारणा या जगती || ६७.**

**तृषार्त आणि तप्त धरतीला, येई क्षमता सृजनाची |**

**आनंद पसरे जगतामाजी, असे कृपा ही प्राणाची || ६८.**

**सौम्य अग्नीने, सिंधु जलाचे, मेघ बने किरणाद्वारे |**

**वायू योगे, यथाकाल ती, वर्षा करी जीवन हंसरे || ६९.**

**वर्षा हा आधार जगाचा, साधिशी ऋतुचक्राद्वारे |**

**जलवर्षेने, तृप्तचि धरती, सारी सृष्टी ही बहरे || ७०.**

**'काले वर्षतु' पर्जन्याशी, अशी प्रार्थना येई मुखी |**

**सुयोग्य ऐसे चक्र नियोजन, होण्या इहलोकी सुखी || ७१.**

*व्रात्यस्त्वं प्राण एकर्षिः अत्ता विश्वस्य सत्पतिः ।*

*वयमाद्यस्य दातारः पिता त्वं मातरिश्व नः ॥ ११ ॥*

नित्य शुद्ध तूं ,गरज तुला ना, मानवी त्या संस्काराची |

म्हणुनि म्हणती ऋषि एकर्षी, तुला काळजी सकलांची || ७२.

पालक करिती संस्काराशी, आदर्श बालक ते व्हावे |

तूचि पालक सकल जगाचा, आदर्श तुजपासुनी घ्यावे || ७३.

प्राण देवते, देह रक्षणा, अन्नाचा भक्षक होशी |

वायुदेव हा पिता आमुचा, सांभाळशी या देहाशी || ७४.

साऱ्या ब्रह्मांडाशी पाळिशी, नियमनी योग्यचि सुसूत्रता |

एक दुज्याशी जुळविशी नाती, म्हणुनि स्थैर्यचि या जगता || ७५.

कर्म फळांची सुयोग्य सांगड, पेरिलेचि तैसे उगवे |

तुझा न्यायहि अचुक असे तो, साधुभावे वर्तावे || ७६.

*या ते तनूर्वाचि प्रतिष्ठिता या श्रोत्रे या च चक्षुषि ।*

*या च मनसि सन्तता शिवां तां कुरू मोत्क्रमीः ॥ १२ ॥*

**नित्य प्रतिष्ठित वाचेमाजी, तसे लोचनी नि श्रवणी |**

**आणि मनाही व्यापुनी राही, टाकीशी मंगलमय करुनी || ७७.**

**वाणी आमुची समर्थ ठेवी, शब्दी माधुर्या ठेवी |**

**शुभ मंगल लोचने बघावे, मांगल्यचि येवो श्रवणी || ७८.**

**मानस आमुचे शुद्ध नि पावन, ठेवी प्रार्थितो तुजलागी |**

**जेही जीवन आम्हा लाभले, व्यक्तावे आदर्श जगी || ७९.**

**हे भगवंता त्याग ना करी, कदा आमुचा, विनवितो |**

**आदर्शचि आम्हास वर्तवी, प्रार्थनाचि तुज हि करितो || ८०.**

*प्राणस्येदं वशे सर्वं त्रिदिवे यत् प्रतिष्ठितम् ।*

*मातेव पुत्रान् रक्षस्व श्रीश्च प्रज्ञां च विधेहि न इति ॥ १३ ॥*

**जे कांही या जगती आहे, असे प्रतिष्ठित प्राणाने |**

**प्राणाच्याचि आधीन सारे, हे जीवनचि त्या कृपेने || ८१.**

**तुझिया अस्तित्वे चि येतसे, जाण सकलही, जगताची |**

**व्यक्त अव्यक्तहि उमजते, गती होत ती जीवनाची || ८२.**

**प्राण देवते, तूचि माउली तुझी लेकरे विनवितो |**

**समाधान नि सुलभ क्रमावे, जीवन ऐसे प्रार्थियतो || ८३.**

**रक्षी आम्हाला अशुभा पासुनि, मंगलतेने वर्षावे |**

**आचरणी नित येवो शुद्धी, कृतज्ञ चरणी तंव व्हावे || ८४.**

**वाट दावी ती कल्याणाची, अध्यात्मी व्हावी प्रगती |**

**प्रसन्न राहो जीवनात या दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती || ८५.**

**निरामयचि नित्य ते असावे, देहे आणि आम्ही मने |**

**पर्याप्तचि धन आणि साधने, परधन ना ते गृही येणे || ८६.**

**वाचा मंगल मधुर असावी, शब्दी चातुर्या द्यावे |**

**परहित साधन नित्य जीवनी, स्थितप्रज्ञ आम्ही व्हावे || ८७.**

हीच प्रार्थना तुला माउली, सार्थक होवो जन्माचे |

नको याचना आणि दुज्याचे, पालन ते आदर्शांचे || ८८.

**द्वितीय प्रश्न संपला**

# तृतीय प्रश्न

विदर्भाचिये भार्गव ऋषि ते, आचार्या वंदन करुनी |
आमुचे ऋषिवर, समाधानचि, उत्तर आपुले ऐकोनी ||१.

अज्ञानाच्या अंधाराला, काढुनिया सुज्ञान दिले |
धन्य जाहलो ज्ञान प्रसादे, कृतज्ञतेने वंदियले ||२.

प्राणाविषयी ज्ञान ऐकुनी, ऋषि सकल ते आनंदे |
धन्यवाद देती आचार्या, हर्षती ते परमानंदे || ३.

कौशल्याचे अश्वलायनचि, विनम्र वंदन ते करिती |
म्हणती ऐकियले जे सारे, धन्य कर्ण तेणे होती || ४.

शंका उरल्या मनात ज्याही, पृच्छा करितो आपणाशी |
उणीव जीही करा पूर्तता, हीच विनंती तुम्हाशी || ५.

प्राणाविषयी ज्ञान अमुल्यचि, परि शंका ज्या मनी येती |
कृपया मजला धन्य करावे, हीच विनंती तुम्हाप्रती || ६.

पिप्पलाद ते ऋषिवर ज्ञाते, आशीर्वाद तो त्यांनी दिला |
निश्चित मी सांगेनचि वत्सा, जेही ठावे ते मजला || ७.

*अथ हैनं कौशल्यश्चाश्वलायनः पप्रच्छ । भगवन् कुत एष प्राणो जायते ? कथं आयात्यस्मिञ्शरीरे ? आत्मानं वा प्रविभज्य कथं प्रातिष्ठते केनोत्क्रमते ? कथं बाह्यमभिधत्ते कथमध्यात्ममिति ॥ १ ॥*

आपण वर्णियले प्राणाशी, कोण सृजितसे ते त्याला ?|
गर्भी कैसा प्रवेश करितो, हे सांगावे आम्हाला || ८.
करितो आपुले कसे विभाजन, विविधचि कार्या करण्याला |
आणि अंती देह सोडिता, कसा जात नव कर्माला || ९.
प्राणचि देहा बळ तो देतो, कैसा जुंपे कार्याला ?|
देही उद्योगी तो अविरत, विश्वीहि करितो कार्याला || १०.
देही इंद्रिये आणि मनाला, धारण कैशी तो करितो ? |
कृपा करोनी हे सांगावे, हेची आपणा विनवितो || ११.

*तस्मै स होवाच - अतिप्रश्नान् पृच्छसि ब्रह्मिष्ठोऽसीति तस्मात्तेऽहं ब्रवीमि ॥ २ ॥*

म्हणति तया आचार्य, फार तूं, कठीण चि पुसिले प्रश्नाला |

परि तूं उत्तम जाणशी वेदा, म्हणुनि उत्तर देत तुला || १२.

अती गूढ हे रहस्य पुसिले, आरंभ कैसा जीवनाला ?|

वेदाध्ययन हि उत्तम म्हणुनि, सुपात्रचि तूं श्रवणाला || १३.

*आत्मन एष प्राणो जायते । यथैषा पुरुषे छाया एस्मिन्*
*एतद् आततं मनोकृतेन आयाति अस्मिन् शरीरे ॥ ३ ॥*

**प्राण जीवनी केंव्हां यावा, निर्णय आत्मा घेत असे |**
**केवळ भगवंताची इच्छा, प्रवेश देही करीतसे || १४.**
**विलक्षणचि ती माया शक्ती, असे अगम्य नि दुर्धर ती |**
**भगवंताच्या संकल्पाने, सहजी खेळे या जगती || १५.**
**छाया जैसी सहजी येई, नसे कार्य तिज सृजनाचे |**
**केवळ अस्तित्वे देहाच्या, आगमन होई प्राणाचे || १६.**
**सूर्या अर्धांगिनी दोन त्या, छाया नि संज्ञा त्याला |**
**प्रकाश एकीकडे नि छाया, असते दुसऱ्या बाजूला || १७.**
**छायेची ना असे निर्मिती, सह्जची अस्तित्व ते तिचे |**
**तैसे देहाचिये संगती, अस्तित्वहि ते प्राणाचे || १८.**
**प्रकाश असणे सूर्य-स्वभावे, आणि नसणे अंधार |**
**आपैसे अस्तित्वी छाया, माया शक्ती आधार || १९.**
**नसणे ऐसे होई असणे, सृजन न होता, आपैसे |**
**दैवी प्रभाव हा मायेचा, विलक्षणचि हा खेळ असे || २०.**

बिंब पाहता आरशामाजी, सहजी प्रतिबिंबही उमटे |
तैशी जाणीव प्रतिबिंबाने, आत्मा-जीवात्मा प्रगटे || २१.

स्वयंभु जाणीव सर्वव्यापीचि, शक्ती असे ती मायेची |
ब्रह्मी खेळे स्वये ब्रह्मचि, नसता निर्मिती जगताची || २२.

चैतन्याचे प्रतीबिंबचि, जीवन होऊनि विचरतसे |
सूक्ष्म शरीरी प्राण प्रवेशे, चैतन्ये ते खेळतसे || २३.

व्यवहारिक ते सत्य असे हे, एरवी मिथ्या हे सारे |
आधार त्याशी सत्य ब्रह्मीचा, नसणे असण्याच्या द्वारे || २४.

दिसे चित्रपट पडद्यावरती, प्रसंग जणु प्रत्यक्ष घडे |
निश्चल पडदा, प्रकाश छाया, बघता पडदा सहजी दडे || २५.

तैसे आत्मा होत जीवात्मा, खेळ सुरू तो मायेचा |
सुख-दुःखाचा लपंडावहि, खेळ असे हा नसण्याचा || २६.

असतो आत्मा नित्यचि निश्चल, खेळ चालतो विश्वाचा |
परि असे हे अती विलक्षण, नियम पाळिती ब्रह्माचा || २७.

पंच तत्व ते मिश्रण करिता रजोगुणाच्या योगाने |
प्राणशक्ती ती, देही प्रवेशे, ईश्वराचिये इच्छेने || २८.

हे सारेहि घडे सहजची, जैशी छाया ती प्रगटे |
देह निर्मिती होता सहजी, प्राण तत्व सहजी उमटे || २९.

सूक्ष्म गुंतते स्थूलामाजी, प्रभावची चैतन्याचा |
आणि जीवन सुरू होतसे, नसण्यामधुनि असण्याचा || ३०.

स्थूल निर्मिती कर्माधारे, प्रारब्धी जैसे लिहिले |
जशी पेरणी तशी उगवणी, नियमे तेचि रेखियले || ३१.

जैसे मनी ते कृतीही तैशी, कर्मशृंखला बांधतसे |
स्वयेचि प्रारब्धाशी लिहिता, खेळावे लागे तैसे || ३२.

काल्पनिक व्यवहारी सत्या, भुलुनी प्राणी धावतसे |
वाळूचे किल्लेहि बांधितो, आनंद त्यांतची मानितसे || ३३.

मायेचा तो प्रभाव भारी, आकर्षण त्या नसत्याचे |
खोटे सारे खरे मानुनी, वेड धरी स्वामित्वाचे || ३४.

आसक्ती नि ममता बंधन, जन्म-मृत्यूचे खेळ करी |
सुटण्या करी ते जप-तप साधन, ऋण स्वये बांधिता शिरी || ३५.

काम क्रोध हि तया साथीला, रजोगुणांच्या संयोगे |
ऋणा वाढवी, भोगणेही ते, वाढे कर्माच्या योगे || ३६.

यातुनी सुटणे आपुल्या हाती, भजन, पूजने ना सुटका |
नसते बंधन कैसे जाईल? अनासक्तीविण यत्न फुका || ३७.

*यथा सम्राडेवाधिकृतान् विनियुङ्क्ते ।*

*एतान् ग्रामान् एतान् ग्रामान्*

*अधितिष्ठस्व इति इवं एवैष प्राण इतरान् प्राणान् पृथक्*

*पृथगेव सन्निधत्ते ॥ ४ ॥*

**पिप्पलाद ऋषि देती उत्तर, तिसऱ्या प्रश्नी भागाचे |**

**राहे देही प्राण कसा तो,? विभाजन हि होता त्याचे || ३८.**

**देह प्रवेशी प्राण पाही ते, कार्यहि पांच प्रकारांचे |**

**श्वसन, पचन, पोषण, उत्सर्जन, अभिसरणहि ते रक्ताचे || ३९.**

**राजा जैसा निज अधिकारे, विभागास ते वाटितसे |**

**तैसा प्राण हि सुसुत्रतेस्तव कामे ऐसी नेमितसे || ४०.**

**स्वये घेतसे व्यवस्थापना, आणि कार्यही श्वसनाचे |**

**समान पचनी करी साहाय्या आणि पोषण संस्थेचे || ४१.**

**उत्सर्जन करी अपान आणि, व्यान करी अभिसरणाचे |**

**उदान सर्व देहास व्यापीतो, रक्षण आणि देहाचे || ४२.**

देह सोडिता तोचि शेवटी, सारे कार्यही निघण्याचे |

असे विभाजन करुनी स्वयेचि, कार्य समन्वय मोलाचे || ४३.

सकला नेमी कार्य पद्धती, व्यवस्थापना नित्य करी |

आणि बाहेरी जगती या, विविध कार्ये संचारी || ४४.

*पायूपस्थेऽपानं चक्षुःश्रोत्रे मुखनासिकाभ्यां प्राणः स्वयं प्रातिष्ठते मध्ये तु समानः ।*

*एष ह्येतद्धुतमन्नं समं नयति तस्मादेताः सप्तार्चिषो भवन्ति॥५॥*

आणि वाटुनि कार्ये सारी, निवास कोठे हे पाही |

मुख नि नासिका, चक्षु, श्रोत्र हे, प्राण निवासास्तव घेई || ४५.

गुदा उपस्थी, अपान राही, समान उभयी राहतसे |

त्यास देवता आकाशाची, नित्य साहाय्या येत असे || ४६.

समान वायू मध्यभागी तो, सावरीत ताल नि तोला |

जेथं पोकळी आकाश तेथे, साह्यचि समान वायुला || ४७.

भोजन होई यज्ञचि पावन, जठराग्नीला होत स्वाहा |

व्यान खेळवी तो रक्ताला, आवश्यक जैसे देहा || ४८.

मुंडक उपनिषद हि ते सांगे, अग्नी उद्धवे देही या |

जठराग्नी शमविता भोजनी, जिंव्हा साती फुटती तया || ४९.

दोन नेत्री नि श्रवणी दोन त्या, आकार रूपा ध्वनीसाठी |

दोन नासिकी श्वसनास्तव त्या, गंधहि समजायासाठी || ५०.

ज्वाला एक ती मुखि विराजे, रसना वाचा कार्याशी |

अग्निजिंव्हा बहु उपकारी, करी रक्षणा देहाशी || ५१.

*हृदि ह्येष आत्मा।*

*अत्रैतदेकशतं नाडीनां तासां शतं शतमेकैकस्याद्वासप्ततिर्द्वासप्ततिः*

*प्रतिशाखानाडीसहस्राणि भवन्त्यासु व्यानश्चरति ॥ ६ ॥*

**जीवात्मा तो हृदयी राही, सकल व्यवस्था चैतन्ये |**

**हृदयस्थानी शंभर नाड्या, मुख्य ज्यात त्या निज स्थाने || ५२.**

**या शंभरच्या आणखी शाखा, प्रत्येकी शंभर असती |**

**बहात्तर त्या सहस्त्र शाखा, सहाय्य प्रत्येकी करिती || ५३.**

**ऐशा कोटी बहात्तरहि त्या, व्यान फिरे सकलामाजी |**

**तये पूर्ण तो शरीर व्यापी, उपयोगी विविधचि काजी || ५४.**

**हृदय आणि मेंदू ला जोडीती मुख्यत्वे या नाड्याची |**

**मनहि हृदयी ते स्थित राही, येता वेळ सुषुप्तीची || ५५.**

**जागृतीत मन फिरते देही, आणि कार्ये करी त्याची |**

**आत्म्यासंगे साक्षी चैतन्यी, वार्ता सांगे ज्ञानाची || ५६.**

**स्वप्नी मन फिरते नाड्यातुनी, दृश्ये विविधहि साकारी |**

**स्वयेचि द्रष्टा नि निर्माता, सारे एकला तोचि करी || ५७.**

**भावना नि वासनाहि संगे चिंता मनात त्या वसती |**

**साक्षी त्याशी असतो आत्मा, ज्याची हृदयी ती वस्ती || ५८.**

*अथैकयोर्ध्व उदानः पुण्येन पुण्यं लोकं नयति*

*पापेन पापं, उमुभाभ्यामेव मनुष्यलोकम् ॥ ७ ॥*

हृदयापासुनि मस्तक स्थानी, नाडी सुषुम्ना मुख्य असे |

उदान वायू तिच्यात राही, पाप-पुण्य तिज माहितसे || ५९.

अंती नेई पुण्यलोकी ती. शुभ कर्मी जे जन असती |

आणि पापी असतील त्यांना, नरकी करवी अधोगती || ६०.

गती प्राणाची ऊर्ध्व असे ती, अंती उदान ती खेची |

सूक्ष्म देह तो उदान खेची, अंतकाळ तो येताची || ६१.

कार्य शक्ती जी इंद्रियातली अंत समयी ती खेचीतसे |

दिसता इंद्रिये असती परि त्या, कार्य शक्ती ती मुळी नसे || ६२.

नाडी सुषुम्ना, अंतकाळी ती उपासाकाला मदत करी |

हृदयापासुनि नेत प्राण तो, कंठाद्वारे ऊर्ध्व शिरी || ६३.

जेंव्हा श्वसनी श्वास चालतो, दोनही नाकपुड्यामधुनि |

दिव्य नाडी ती नाम सुषुम्ना, अध्यात्मी उच्च स्थानी || ६४.

मस्तकीच्या त्या मध्यभागीचे, उघडी द्वार ते योग्याचे |

ब्रह्मरंध्र त्या द्वारा म्हणती, सहाय्य उदान वायूचे || ६५.

पुण्य गांठीशी जास्तचि असता, ऊर्ध्व लोकी ती पुढील गती |

पापे असता बहु जीवनी, जीव भोगितो अधोगती || ६६.

समान पाप नि पुण्यहि असता, जन्म मानवी तदा मिळे |

अशी गती ती कर्म निगडीत, जीवास हे सारेची कळे || ६७.

कोणत्याही त्या करिता कार्या, ध्यानी निश्चित ठेवावे |

हेतू त्यातील फळा देतसे, आणि लागते फेडावे || ६८.

ज्ञानवंत जे असती जगती, ओढा ब्रह्मज्ञानाचा |

त्यास जन्म तो उच्च घरी मिळे, रस्ता चाले मुक्तीचा || ६९.

*आदित्यो ह वै बाह्यः प्राण उदयत्येष ह्येनं चाक्षुषं प्राणमनुगृह्णानः ।*

*पृथिव्यां या देवता सैषा पुरुषस्य अपानं अवष्टभ्य अन्तरा यदाकाशः स समानो वायुर्व्यानः॥८॥*

**सूर्यदेवचि बाह्य प्राण तो, जगतातील त्या सकलांचा |**

**उदित होता ज्ञान-इंद्रिया, देई पुष्टी शक्तींचा || ७०.**

**पृथ्वीमध्ये अपान वायू, खाली खेचणे गुण त्याचा |**

**म्हणुनि गुरुत्वाकर्षण शक्ती, संग न सोडी धरतीचा || ७१.**

**हाच वायू उत्सर्जन करी नि, यत्न तयाचा शुद्धीचा |**

**नको असे जे आरोग्यास्तव, बाहेरी त्या त्यागाचा || ७२.**

**आकाश जेही पृथ्वीच्या वरी, धरती आणि स्वर्गाच्या |**

**समान वायू त्यात असे तो, रक्षणास तो देहाच्या || ७३.**

**श्रोत्र इंद्रिया ऐकू येण्या, समान वायू साह्य करी |**

**आकाशी जो विचरे वायू, व्यान रक्षी तो बाहेरी || ७४.**

**आंत असे जो व्यान देही तो, मदत करी चैतन्याला |**

**क्रिया शरीरी त्यास सहाय्ये, देत असे तो शांतीला || ७५**

अभिसरणातुनी पोषक द्रव्ये, नखांतहि व्यानचि पुरवी |

समान वायू पोचवी द्रव्ये, आवश्यकता जशी हवी || ७६.

शुद्ध प्राण तो व्यानचि फिरवी, पोषण होई ते तेणे |

सारी व्यवस्था उत्तम चाले, देखरेख होते प्राणे ||७७’

*तेजो ह वा उदानः तस्मादुपशान्ततेजाः ।*

*पुनर्भवं इन्द्रियैर्मनसि संपद्यमानैः ॥ ९ ॥*

पिप्पलाद ते महान ऋषिवर, करिती पूर्तता प्रश्नाची |
प्राण एकला कैसा करितो, कामे देह नि जगताची || ७८.

देहा आंतील विविधही कर्मे, तैसी ती ब्रह्मांडाची |
अंतरिक्षीच्या दिव्य ज्योतीही, गतीशी ऊर्जा प्राणाची || ७९.

उदान वायू तेजोगुणीचि, चित्रगुप्त तो हाची असे |
कार्यामधला हेतू जाणुनी, नोंद तयाची ठेवितसे || ८०.

उदान वायूस अग्नी सहाय्या, उष्मा देहा तो देई |
म्हणुनि देहा मृत्यु येता, उष्मा तो निघुनि जाई || ८१..

मृत्यूकाली उदान वायू, सूक्ष्म शरीरा खेचीतसे |
नेई गाठोडे कर्मांचे, पुढले ते प्रारब्ध असे || ८२..

सूक्ष्म रूपे इंद्रिये ती नेई, जीव मानवी देहाचे |
मृत्युनंतर म्हणुनि कळती, भाव येथल्या व्यक्तींचे || ८३.

स्थूल इंद्रिये निरूपयोगीची, प्राण सोडी जंव देहाला |
प्राण-शक्तीचि पुरवी ऊर्जा, कार्ये त्यांची करण्याला || ८४.

*यच्चित्तस्तेनैष प्राणमायाति प्राणस्तेजसा युक्तः ।*

*सहात्मना तथासङ्कल्पितं लोकं नयति ॥१०॥*

सूक्ष्म वासना चित्ती अतृप्तचि, उतावळ्या त्या पुर्तीशी |

शिरती वासनादेही अंती, पुढिले जन्मी भोगाशी || ८५.

पशु वा मानव कि वनस्पती, ठरते अनुकूल ते जैसे |

तसा जन्म तो पुढचा घेई, स्वरूप त्यांचे जसे असे || ८६.

आदित्य, अग्नि पृथ्वी वायू नि, आकाश साह्य ती प्राणाशी |

प्राण शक्तीला देत सूर्यचि, उणीव ना भांडाराशी || ८७.

विविध कर्मी करुनि विभाजन, प्राण देही असतो जैसा |

सकलचि विश्वी विविध देवता, कार्याशी वाटे तैसा || ८८

छांदोग्यी वर्णिले असे ते, मृत्यू जवळी जंव येई |

काय नेमके घडते तेंव्हा, प्राण सोडुनि जंव जाई || ८९.

मृत्युकाल तो जवळी येता, विचार तेही भरकटती |

ऱ्हास होतसे आत्मबलाचा, वृथाची मन कांही चिंती || ९०.

अनाहूत चिंता व्यवहारी, खिन्न अनाठायी होई |

भान न राही वस्तुस्थितीचे, स्वैर भास मनी येई || ९१.

नको तेथले संदर्भहि ते, जुळवुनी बोले कांही तरी |
भूतकालीच्या प्रसंगास ते, घडती आता असे स्मरी || ९२.

देह सोडिता, उदान वायूत, जीवहि जाऊनिया मिळे |
इतर प्राणहि त्याशी मिळती, वृत्ती आदि ते सगळे || ९३.

गीतेत सांगती देव आपणा, विचार अंती जे येती |
पुढले जन्मी प्राण्यालागी, तैसीची ती मिळे गती || ९४.

म्हणुनि नित्य हरिस्मरणी असावे, जगती करिता व्यवहारा |
मरण कदाही येते म्हणुनि, नकोचि अशुद्धिस थारा || ९५.

शुद्ध असावे नित्य अंतरी, विषयी गोडी नकोची ती |
पशुही तो आनंद भोगिती, पुन्हा नको ती अधोगती || ९६.

एकचि जन्म असा हा असतो, जेणे होई कल्याण |
वृथा न दवडी, शुभ संधी ही, निजस्वरुपा घे जाणून || ९७.

*य एवं विद्वान् प्राणं वेद न हास्य प्रजा हीयते अमृतो भवति*

*तदेषः श्लोकः ॥ ११ ॥*

अध्यात्मी जे प्रगत स्तरावरी, साक्षी भावे त्या कळते |

देहाविषयी ना आसक्ती, अंतर्मुखचि करी त्याते || ९८.

उपासना करी प्राण देवता, जेणे सकला सौख्य मिळे |

व्यष्टी तैसी समष्टीस ते, आचरणे हित ज्याचिमुळे || ९९.

जैसे आचरण मला सुखावे, तसेचि वर्तन इतरांशी |

आशीर्वाद नि सदिच्छाच त्या, निगडीत होती कर्मांशी || १००.

कर्मी आपुल्या स्वार्थ नसावा, निष्कामे जीवन आचरी |

श्रवण, मनन नि निदिध्यासने, अध्यात्मी स्तर उंच करी || १०१.

येणे कळतो मार्ग जीवनी, कल्याणाचा कसा धरी |

परंपरा ती संतानाची, वंशी नित्यचि देत हरी ||| १०२.

स्मरण करी तो इष्ट शक्तीचे, देहासक्ती ना तेथे |

अंती जैसे राही मानस, तैशी गती मिळते त्याते || १०३ .

*उत्पत्तिमायतिं स्थानं विभुत्वं चैव पञ्चधा ।*

*अध्यात्मं चैव प्राणस्य विज्ञायामृतमश्नुते विज्ञायामृतमश्नुत इति ॥ १२ ॥*

प्राण निर्मिती होई कैशी ? देही प्रवेशा करी कैसा?|

कैसा व्यापे तो देहाशी ? पांची विभाजन होत कसा?|| १०४.

ऋषि मुनींनी सत्य गवसण्या, जैसे आचरिले जगती |

हे जो कोणी यथार्थ जाणे, आनंदाची नित प्राप्ती || १०५.

त्याशी लाभे चिरंजीवता, अमृततत्व तया लाभे |

जीवन व्यतीत होई त्याचे, निरामयचि ते अति सुलभे || १०६.

मानवी जीवन अतीच दुर्लभ, दुजा मार्ग ना मुक्तीला |

म्हणुनि ज्ञान हे यथार्थ उमगुनी, करी कृतार्थ या जन्माला || १०७.

निष्कामे नि अनासक्तीने, विवेक वैराग्याधारे |

पैल तिराला जावे सहजी, अध्यात्माचे आधारे ||१०८.

प्रश्न तिसरा समाप्त

# प्रश्न चवथा

*अथ हैनं सौर्यायणि गार्ग्यः पप्रच्छ । भगवन् एतस्मिन् पुरुषे कानि स्वपन्ति ?*

*कानि एस्मिन् जाग्रति ? कतर एष देवः स्वप्नान् पश्यति ? कस्यैतत् सुखं भवति ?*

*कस्मिन्नु सर्वे संप्रतिष्ठिता भवन्तीति ॥ १ ॥*

सर्व प्रश्नीचे यथार्थ उत्तर, ऋषि सारे ते ऐकोनी |
कृतज्ञ वंदन करिती गुरूला, होऊनिया तृप्तची मनी || १.

चतुर्थ प्रश्नी पुसण्यासाठी, ऋषि झालेचि आतुर ते |
जीवात्मा नि परमात्मा हे, एकचि गुरु वचने कळते || २.

ऋषिवर श्रीगुरु पिप्पलाद हे, शंका मिटविती त्या मनीच्या |
अद्वैताचे द्वार उघडती, वाटा दाविती मुक्तीच्या || ३.

सौयार्यणी, जे गर्ग कुळीचे, विनये आले पुसण्याला |
विनम्र वंदन करुनि ऋषीवरा, संमती घेती प्रश्नाला || ४.

पिप्पलाद ऋषि प्रसन्न होऊनि, म्हणती विचार तूं मजला |
पांचहि शंका शिष्य विचारी, चवथ्या प्रश्नी श्री गुरूला || ५.

पहिल्या प्रश्नी पुसिले ऐसे, ज्या अमुच्या देही वसती |
कवण देवता, झोपी जाती, निद्रा समयी ज्या निजती ?|| ६.

स्वप्नावस्था असे देहीची, घेती त्याही कां विश्रांती ?|
देह निवासी कवण देवता, विना कार्य त्या स्तब्धविती ?|| ७.

हेही दुजे ते मजशी सांगा, जागृत कवणहि त्या असती ?|
ज्याही देवता कार्यशक्तीच्या, ना घेती ज्या विश्रांती || ८.

कार्य शक्ती ती निद्रेमाजी, कवणची निद्राधिन होई ?|
आणि अविरत कार्यमग्न त्या, देह जरी झोपी जाई || ९.

कोण देवता स्वप्न पाहती, सुषुप्तीत सुख कुणा मिळे ?|
आणि देवता या साऱ्याहि, आश्रयी असती कुणामुळे ?|| १०.

स्वप्नावस्था, आणि सुषुप्ती, या विषयीच्या या शंका |
सुषुप्ती समयी, प्रगाढ निद्रा, कोण भोगीते तया सुखा?|| ११.

अवस्थात्रयी जी अनुभूती, साक्षी-भावे कशी असे ?|
जाणुनि घेण्या प्रश्न असे हा, शंका मनी त्या ज्याहि वसे || १२.

शंकाद्वारे जाणुनी घेती, अवस्था त्रयी गुह्याशी |
आत्मतत्व ते जया मागुती, दृश्य आणि ते द्रष्ट्याशी || १३.

जीवात्मा नि परमात्म्याचे, एक दुज्याशी जे नाते |
त्याची स्पष्टता शिष्या होई, जाणुनिया त्या गुह्याते || १४.

*तस्मै स होवाच । यथा गार्ग्य मरीचयोऽर्कस्यास्तं गच्छतः सर्वा एतस्मिंन् तेजोमण्डर्ल एकीभवन्ति । ताः पुनः पुनः उदयतः प्रचरन्त्येवं ह वै तत् सर्वं परे देवे मनस्येकीभवति तेन तर्ह्येष पुरुषो न श्रृणोति न पश्यति न जिघ्रति न रसयते न स्पृशते नाभिवदते नादत्ते नानन्दयते न विसृजते नेयायते स्वपितीत्याचक्षते ॥ २ ॥*

हे गार्ग्या, तो जेंव्हा भास्कर, अस्त पश्चिमी होतांना |
पसरलेली ती त्याची किरणे, करि एकत्रित जातांना || १५.
निद्री आविष्कार तेजाचा, आवरुनि बिंबी त्या वसती |
तेंव्हा कार्यान्वितचि देवता, शक्तीच्या त्या मनी जमती || १६.
प्रगाढ निद्रा समयी साऱ्या, श्रेष्ठ मनी विलया जाती |
मन जाई ते पूर्ण अंतरी, बाह्य ना करी कार्ये ती || १७.
जागृतीचे व्यापार थबकती, विस्मृतीच जणु ती जगती |
त्या काळी तो सुप्त जीवात्मा, पूर्ण घेतसे विश्रांती || १८.
ना तो ऐके, ना ही देखे, घेई न गंधा, ना स्वादा |
स्पर्श ना करे, नच तो बोले, घेणे देणे, नसे तदा || १९.

उत्सर्जन ना, नसे ग्रहणही, तैसेहि चालणे नसे |

कामक्रीडाहि पूर्ण थांबती, कार्ये बंदचि करीतसे || २०.

सारी जीही दाही इंद्रिये, कार्याशी ते ना करिती |

देहा बघुनी जाणती सारे, घेई निद्रा विश्रांती || २१.

जागृत होता, मना सोडुनि, होती वेगळी सारी ती |

उदयी जैसा येता भानु, त्रिभुवनी किरणे ती जाती || २२.

सकलांशी ती व्यापुनियाचि, होई सर्वत्रचि प्राप्ती |

तशी इंद्रिये करिती कार्या, नेमियली जैशी असती || २३.

*प्राणाग्नय एवैतस्मिन् पुरे जाग्रति ।*

*गार्हपत्यो ह वा एषोऽपानो व्यानोऽन्वाहार्यपचनो*

*यद् गार्हपत्यात् प्रणीयते प्रणयनाद् आहवनीयः प्राणः ॥ ३ ॥*

ऋषिवर सांगती, कायानगरीत, पंच प्राणरूप अग्नि परि |
निद्राकालीहि जागृत असतो, देह व्यवस्था कार्य करी || २४.

वायुदेवता नित्यची जागृत, चिरंजीव हनुमंतचि तो |
वायुपुत्र तो सदैव जागा, आत्माराम न सोडी तो || २५.

प्राणशक्ती जी तोचि राम तो, आणि प्राण हनुमान असे |
उभय एक रुपेची राहती, म्हणुनि तो हृदयात वसे || २६.

निद्रा हा जणु यज्ञ असे तो, प्रदीप्त प्राणरुप अग्नी |
गार्हपत्य तो अपान वायू, व्यान जाण दक्षिणाग्नी || २७.

दक्षिणाग्नि तो पितृकर्मीचि, दक्षिण ही तर यम-दिशा |
व्यान वायूहि हृदय दक्षिणी, जोवरी ना ये मृत्यू दशा || २८.

मुख्य प्राण तो आहवनियचि, गार्हपत्य त्या अग्नीतुनी |
अन्नरूप त्या जणु आहुती, प्राणा देती जशा हवनी || २९.

*यदुच्छवासनिःश्वासावेतावाहुती समं नयतीति स समानः ।*

*मनो ह वाव यजमानः ।*

*इष्टफलमेवोदानः ।*

*स एनं यजमानं अहरहर्ब्रह्म गमयति ॥ ४ ॥*

**श्वास नि उच्छवासचि आहुती, अग्निहोत्ररुपी यज्ञात |**

**जेणे पोषक द्रव्ये देही, समान वायू त्या नेत || ३०.**

**क्रिया करवी यजमानचि मन, म्हणुनि सुषुप्तीत सौख्य तया |**

**परतफेड ती उदान देई, शीण मनाचा तो जाया || ३१**

**असे परि ते तामस सुखचि, मात्र विषय तेथे नसती |**

**ब्रह्म सुख ते गुणातीतचि, परि सौख्याची अनुभती || ३२.**

**पुरोहित जणु समान वायू, श्वसनाची देई आहुती |**

**तेणे पोषण नित देहाचे, यज्ञाची हि फलप्राप्ती || ३३.**

*अत्रैष देवः स्वप्ने महिमानमनुभवति । यद्दृष्टं दृष्टमनुपश्यति श्रुतं श्रुतं एवार्थं*

*अनुश्रृणोति, देशदिगन्तरैश्च प्रत्यनुभूतं पुनः पुनः प्रत्यनुभवति दृष्टं चादृष्टं च*

*श्रुतं चाश्रुतं चानुभूतं चाननुभूतं च सच्च असच्च सर्वं पश्यति सर्वः पश्यति ॥ ५ ॥*

**जागृतीत जे अनुभवी, ऐके, जीवात्मा अनुभवी पुन्हा |**

**स्वप्नाची ती अगाध सृष्टी, कधी मिसळे त्या दृशांना || ३४.**

**मन आणि ती सूक्ष्म इंद्रिये, जीवात्म्याला दाखविती |**

**जागृतीतली कांही दृश्ये, मिसळी एक दुज्याशी ती || ३५.**

**मनचि दृश्ये स्वये बनुनी, द्रष्टाही तोचि होई |**

**जीवात्म्या तो सारे अनुभवी, नवनवीन अनुभव घेई || ३६.**

*स यदा तेजसाऽभिभूतो भवति ।*

*अत्रैष देवः स्वप्नान्न पश्यत्यथ तदैतस्मिन् शरीरे एतत्सुखं भवति ॥ ६ ॥*

**निद्रेची अति गहन अवस्था, येता उदान तेजरूपी |**

**मना पोचवी जीवात्म्याशी, हृदयी मन जाते झोपी || ३७.**

**व्यापारहि ते सर्व मनाचे, पुरते स्तब्धचि तंव होती |**

**जीवात्माहि मनासंगती, घेई सुखाची अनुभूती || ३८.**

**प्रारब्ध कर्मे तेथं थांबती, वासनाही विरुनी जाती |**

**विचारही निष्क्रिय होऊनि, जणु त्याही येई सुप्ती || ३९.**

**चैतन्याने पूर्ण उदानहि, जीव-शीव येती जवळी |**

**परि अज्ञाने जीव नोळखी, त्यासी सुषुप्तिच्या काळी || ४०.**

**कारण देही असे जीवात्मा, प्राज्ञ अवस्था ती म्हणती |**

**ना स्वप्ने नि नाही इच्छा, सुखाचीच ती अनुभती || ४१.**

**जरी शून्य ती असे अवस्था, अद्वैताची पूर्ण स्थिती |**

**सारे एकवटे त्या शून्यी, आनंदाची अनुभती || ४२.**

देहाचा अभिमान शून्यचि, कामना नि वासना नसे |
हीच अवस्था ज्ञानी असता, ज्ञेयची लाभे आपैसे || ४३.

आनंदमय कोषात जीव परि, भोगी सुख अज्ञान स्थिती |
मना मिळतसे पुरी विश्रांती, उदान देत ही अनुभूती || ४४.

*स यथा सोभ्य ! वयांसि वसोवृक्षं संप्रतिष्ठन्ते ।*

*एवं ह वै तत् सर्वं पर आत्मनि संप्रतिष्ठते ॥ ७ ॥*

**सायंकाळी, विहंग आपुल्या, परत कोटरी ते जाती |**

**तैसे सकलहि तत्व आश्रया, परब्रह्माच्या त्या घेती || ४५.**

**ब्रह्म एकले आधार सकला, सत्य असो वा ते मिथ्या |**

**द्वैताच्या भासातुनी निघता, सारे एकवटे सत्या || ४६.**

*पृथिवी च पृथिवीमात्रा चापश्चापोमात्रा च तेजश्च तेजोमात्रा च वायुश्च वायुमात्रा चाकाशश्च आकाशमात्रा च चक्षुश्च द्रष्टव्यं च श्रोत्रं च श्रोतव्यं च घ्राणं च घ्रातव्यं च रसश्च रसयितव्यं च त्वक्च स्पर्शयितव्यं च वाक्च वक्तव्यं च हस्तौ चादातव्यं च उपस्थश्च आनन्दयितव्यं च पायुश्च विसर्जयितव्यं च पादौ च गन्तव्यं च मनश्च मन्तव्यं च बुद्धिश्च बोद्धिव्यं च अहङ्कारश्च अहङ्कर्तव्यं च चित्तं च चेतयितव्यं च तेजश्च विद्योतयितव्यं च प्राणश्च विधारयितव्यं च ॥ ८ ॥*

निद्रेमाजी घेत विसावा, पंचभुते नि तन्मात्रा |
शब्द स्पर्श नि अन्य विषयही, कार्याची थांबे यात्रा || ४७.

देही इंद्रिये विषया सहिते, घालविती त्यांचा थकवा |
स्थिरावती ती कर्म इंद्रिये, पुन्हा तजेला तो यावा || ४८.

बाह्य कृती त्या पूर्ण थांबती, मन बुद्धीला विश्रांती |
अहंकार नि वृतीसंगे, अनुभवी व्यष्टी ती शांती || ४९.

स्तब्ध होती व्यवहारही सारे, पूर्ण शांतीवर लक्ष जडे |
व्यक्तित्वाला नसेच थारा, शून्य अवस्था ती आवडे || ५०.

मीपण गेले, नसे कामना, सैल बंधने, ती सारी |
अस्तित्वाची विरे आठवण, संसारी ना व्यवहारी || ५१.

**आपुल्या अस्तित्वाचि जाण ना, केवळ ओढचि शांतीची |**

**असुनी नसणे, तदा आवडे, शून्य होतसे सर्व गती || ५२.**

**सकल वृत्ती नि हेतूहि नुरे, नाते स्तब्धतेशीचि  जडे |**

**शून्यी सहजी होत समर्पण, नसनेपण केवळ आवडे || ५३.**

*एष हि द्रष्टा स्प्रष्टा श्रोता घ्राता रसयिता मन्ता बोद्धाकर्ता विज्ञानात्मा पुरुषः । स परेऽक्षर आत्मनि संप्रतिष्ठते ॥ ९ ॥*

विज्ञानात्मा पुरुष अंतरी, जीवात्मा तो अनुभवतो |
विषयांची घेई अनुभूती, विविधही कर्मोंते करितो || ५४.

स्पर्शे, ऐके, गंध अनुभवी, चिंतन करी, जाणुनि घेई |
देही जीवात्मा परब्रह्माच्या, सदा आश्रयेची राही || ५५.

सर्वव्यापीचि परब्रह्म ते, आश्रय देहा जंव देई |
जीवात्मा तो भ्रांतीनेचि, वृथाचि अलगपणा घेई || ५६.

गुंते व्यष्टीतचि अज्ञाने, अहंबुद्धीने बद्ध वृथा |
स्वये दृश्य नि द्रष्टा होई, स्वयेचि असता परमात्मा || ५७.

सर्वव्यापी ती जाणीव असता, देही वेगळी ती मानी |
उसनी जाणीव त्यातूनि घेता, अनुभव घेई दुजेपणी || ५८.

अस्तित्वहि ते असेचि उसने, वृथा रमतसे तो  द्वैती |
जे तो वास्तव आहे तरीही, यत्न करी मिळण्या प्राप्ती || ५९.

*परमेवाक्षरं प्रतिपद्यते स यो ह वै तदच्छायं अशरीरं अलोहितं शुभ्रमक्षरं*

*वेदयते यस्तु सोम्य! स सर्वज्ञः सर्वो भवति। तदेष श्लोकः॥१०॥*

**या जन्मी जे आलो आपण, भ्रांती पुरती जाण्याला |**

**द्वैती राहुनी, येथं क्रीडेस्तव, पुनश्च ब्रह्मी मिळण्याला || ६०.**

**जो मी आहे, तया शोधितो, ईश्वर नित्य हृदयस्थानी |**

**निराकार, नि निर्गुण शाश्वत, मीच ब्रह्म ते जाणोनी || ६१.**

**अशी जाण ज्या भाग्ये येई, स्पष्ट अनुभवे अद्वैती |**

**अनंत अस्तित्वास अनुभवे, चिरंजीवचि ते होती || ६२.**

**साधक ना तो सिध्द होतसे, नित्यचि तो तुर्येत वसे |**

**दिसे जगाला व्यवहारी तो, परी असुनिया त्यांत नसे || ६३.**

**अंतरी आणि बाहेरी ही, पाही परि त्या जाण नसे |**

**समदृष्टीने जगास पाही, प्रतिक्रिया ना कदा असे || ६४.**

**जे घडते ते निवांत पाही, जणु नाटकचि पाहतसे |**

**जीही भूमिका तयास करणे, उत्तम उठवी न गुंततसे || ६५.**

स्थुलदेहाचे असे आवरण, केवळ ते कार्यासाठी |
नित्य अलिप्तचि तो व्यवहारी, सदा अनुभवी जगजेठी || ६६.

सांत देही या अनुभव जे-जे, खेळ असती ते मायेचे |
त्यांत न गुंते, जरि ओढीतो, गाडे ते व्यवहाराचे || ६७.

आवडे केवळ आत्मबोधचि, तयेची जाणतसे सकला |
सारे वासुदेव तयाशी, अनात्म कांही नच त्याला || ६८.

भेद नुरे त्या आप नि पर हा, ज्ञान वेगळे त्या नाही |
मीचि सकल हे, ज्ञान तयाला, अद्वैती नित्यचि राही || ६९.

मोक्ष ही स्थिती नित्यचि त्याची, बंधन नाही कसलेही |
भोग नि भोक्ता उभयहि तोचि, त्या कांही करणे नाही || ७०.

विज्ञानात्मा सह देवैश्च सर्वैः प्राणा भुतानि संप्रतिष्ठन्ति यत्र ।
तदक्षरं वेदयते यस्तु सोम्य ! स सर्वज्ञः सर्वमेवाविवेशेति ॥ ११ ॥

आश्रय घेती भगवंताचा, जीवात्मा नि, पंच भुते |
अंत:करणासहित इंद्रिये आणि सर्वचि प्राणही, ते || ७१.

जाणे ऐशा सर्व-स्वरूप नि, सर्वज्ञहि,परमेशाला |
भाग्यवान तो होई समरस, मिळे जाऊनि तो त्याला || ७२.

जीवात्मा विज्ञान स्वरूपी जो, आश्रयचि ब्रह्मांडाचा |
अविनाशी, नि अक्षर ऐशा, सर्वव्यापी भगवंताचा || ७३.
आश्रय घेऊनी समरस जोही, ब्रह्म स्वये तोचि झाला |
शिव होऊनिया भजे शिवाला, कृतार्थ जन्म तये केला || ७४.
तो जाणे कि, मीच ब्रह्म ते, आश्रय नच मज देहाचा |
पुरी जागृती तयास आली, तोचि आश्रय सकलांचा || ७५.
ब्रह्म नि तो हा, भेद नसेचि, पुरती त्याशी अनुभूती |
बाहेरी दिसतो व्यवहारी, अंतरी पूर्णतया शांती || ७६.
'मी' म्हणता तो, नसेचि व्यष्टी, पूर्ण ब्रह्म कि, जणु बोले |
देह असे हे केवळ साधन, करी ब्रह्मे जे योजियले || ७७.
जगती असती ज्याही भावना, ज्ञात्याशी त्या जाणवुनी |
यथाशक्ती तो करी पूर्तता, सहजी ऐक्यचि येत मनी || ७८.
मीच मला ते सहाय्य करिता, प्रश्न नसे उपकाराचा |
विश्वात्मक तो भावचि सहजे, नुरे भाव तो भेदाचा ||७९.
व्यष्टी म्हणुनी नसे अलगपण, ब्रह्म म्हणोनि सकल असे |
अद्वैती ना कांही असणे, सर्वव्यापी मी अलग नसे || ८०.

चवथा प्रश्न संपला.

# प्रश्न पांचवा

चार शिष्य ते वेदाध्यायी, प्रश्न विचारिती मोलाचे |
श्रवणी येता अमृत गंगा, पान अखंडचि ज्ञानाचे || १.

तृप्त जाहले, वाटे धन्यता, प्रकाश अंतरी तो उजळे |
वंदन करिती आचार्यांना, भावे कृतज्ञता उसळे || २,

पुढती आले सत्यकाम ते, पुत्ररत्न जे शैब्याचे |
विनम्र होऊनि अती आदरे, अनुमती मागती प्रश्नाची || ३.

प्रसन्न होती आचार्य तेंव्हा, म्हणती विचारी, जेहि मनी |
करुनी नमना, ऋषि विचारिती, शंका आपुल्या त्या प्रश्नी || ४.

*अथ हैनं शैब्य: सत्यकाम: पप्रच्छ । स यो ह वै तद् भगवन् मनुष्येषु*

*प्रायणान्तं ओङ्कारं अभिध्यायीत । कतमं वाव स तेन लोकं जयतीति ॥ १ ॥*

गुरुदेवा मजशी सांगावे, उपासना जो करी आदरे |

निष्ठापूर्वक आपुले जीवना, पावन करितो ॐकारे || ५.

व्यतीत करी तो अपुले जीवन, उपासना ॐकाराची |

देहा येता अंत्य समयही, नच सोडी संगत त्याची || ६.

ऐशी निशिदिनी करि उपासना, लाभे त्याशी कवण गती ?|

फल ते त्याला काय लाभते, कवण्या लोकाची प्राप्ती ?|| ७.

गीतेमाजी कृष्ण सांगती, वेळ ना कळे मृत्यूची |

म्हणुनि नित्यची कार्ये करिता, नच विस्मृती भगवंताची || ८.

सारे करणे, काये वाचे, आणि मनाने या जगती |

ते सारे मजसाठी करावे, अर्पावे ते मजप्रती || ९.

कर्महि ब्रह्म नि, कर्ता ब्रह्मचि, ब्रह्मी सारे होमियले |

ॐ तत्सत्, भावे पुरत्या, नि:संगे ते अर्पियले || १०.

नित्य अलिप्तचि, पूर्ण विवेके, साधावी ती निवृत्ती |

आचरुनी प्रवृत्ती श्रद्धेने, अलिप्ततेने ती मुक्ती || ११.

बाहेरी आवडी कर्माची, परि जाणे मी नच कर्ता |

मजकरवी घडविते प्रकृती, ‘मी’ ना याचा करविता || १२.

देहाचा रथ सहजी चाले, रथात ‘मी’ या बैसतसे |

कोठे कैसे कशास जाणे? कदापि न हे पुसत असे || १३.

करणे वा ते नाचि करणे, सारे ईश्वर तो जाणे |

खेळ असे हा तर मायेचा, ‘मी’ केवळ साक्षी होणे ||१४.

अशी जयाची मनी भावना, गुरुदेवा सांगा मजला |

फल त्याचे ते काय लाभते?, समजवी हे गुरुदेव मला || १५.

*तस्मै स होवाच - एतद्वै सत्यकाम परं चापरं च ब्रह्म यदोङ्कारः ।*

*तस्माद् विद्वान् एतेन एव आयतनेन एकतरं अन्वेति ॥ २ ॥*

**ऐकुनी प्रश्ना पिप्पलाद ते, म्हणती आनंदे त्याशी |**

**उत्तम प्रश्न असे हा निगडित, पर नि अपरही ब्रह्माशी || १६.**

**त्रिगुणासहिते, भौतिक शास्त्रे, विद्या व्यवहार नि कला |**

**यांसी संज्ञा 'अपरा विद्या' 'परा' ती आत्मज्ञानाला || १७.**

**एकचि हा ॐकार असा जो, कार्य नि कारण उभय असे |**

**उपासना ती जैशी ज्याची, फलही लाभे त्या तैसे || १८.**

**तीनही मात्रा, फलित वेगळे, एक एक त्या मात्रेचे |**

**अमात्र आणि कुणी चिंतिता, प्रत्यक्षचि फल ब्रह्माचे || १९.**

**चिंतन जेंव्हां निष्कामचि ते, पूर्ण समर्पित भावाने |**

**ब्रह्म होऊनि ब्रह्मा भजणे, देहातीत होत जेणे || २०.**

**मावळती मात्रा नि उरते, केवळ निश्चल अनुभूती |**

**कुणी उरे ना पूजक, पूज्य हि, केवळ अनुभवी ब्राह्मीस्थिती || २१.**

*स यद् एकमात्रं अभिध्यायीत स तेनैव संवेदितः तूर्णमेव जगत्यां अभिसंपध्यते ।तं ऋचो मनुष्यलोकं उपनयन्ते स तत्र तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया संपन्नो महिमानं अनुभवति ॥ ३ ॥*

**आता श्रवण करी अवधाने, उपासना नि फल त्यांचे |**

**वेगवेगळ्या ज्याही प्रकारे, मात्रा फल प्रत्येकाचे || २२.**

**ॐकारातील पहिली मात्रा, प्रधान 'अ' कार ज्यात असे |**

**भूलोकीशी संबंधित ही, सकाम इच्छा पुरवितसे || २३.**

**उपासना ती 'विराट' याची, इहलोकीच्या इच्छांना |**

**करी पूर्तता, भौतिक ज्याही, जीवनातल्या त्या नाना || २४.**

**पुरते रंगती 'विराट' याशी, देवता नि ते समरसती |**

**सकाम ऐशी ती उपासना, इच्छी भौतिकचि प्राप्ती || २५.**

**मिळे जन्म त्या पुन्हा मानवी, ऐहिक सौख्ये ती मिळती |**

**भौतिक जीवन सुलभचि करी ते, उत्तम लाभे पुढे गती || २६.**

**ॐकाराचे उच्चारण ते, करिता ज्याही संकल्पा |**

**प्रणवाची ती अगाध शक्ती, मिटवी प्रपंच्याच्या तापा || २७.**

**संसाराचा गाडा जाई, सुलभ अशा त्या,मार्गाने |**

**बिकट समस्या सहजी सुटती, धार्मिक त्या आचरणाने || २८.**

लाभे धन नि मान सत्कीर्ति, ऐहिक लाभे, सुखी असे |

पूजा-अर्चा, सगुण भक्ती, व्रते नियम तो गुंततसे || २९.

सौख्य मिळे त्या, परी न शांती, आणि अनुभूती ना हरीची |

अनित्यात त्या रमुनी जाई, आवडी त्या संसाराची || ३०.

‘अ’ची मात्रा ॐकारे ती, संतती आणि वंशाला |

फल देई ते संसाराचे, वर्धन करी धार्मिकतेला || ३१.

*अथ यदि द्विमात्रेण मनसि संपद्यते सोऽन्तरिक्षं यजुर्भिः उन्नीयते*

*सोमलोकम् । स सोमलोके विभूतिं अनुभूय पुनरावर्तते ॥ ४ ॥*

**दुज्या ‘उ’ मात्रे उपासना ती, ‘हिरण्यगर्भा’ जे भजती |**

**प्रधान मानसचि ते जेथे, देहा पुढची असे स्थिती || ३२.**

**अंतरिक्ष हे तेज दर्शवी, साधकास कार्यी उजळे |**

**हाती घेतल्या कार्यालागी, उज्वल करी तो, सिद्धीमुळे || ३३.**

**उत्तम संशोधन नि गूढ तो, उकली आपुले प्रज्ञेने |**

**मार्ग सुचे त्या समस्येतुनी, सहजी निर्णय करी ज्ञाने || ३४.**

**अंती जाई चंद्रलोकी नि सौख्य भोगुनी इहलीकी |**

**असे फलित हे ‘उ’मात्रेचे, अल्पश्रमी तो होत सुखी || ३५.**

*यः पुनरेतं त्रिमात्रेण ॐ इति एतेन एव अक्षरेण परं पुरुषं अभिध्यायीत स तेजसि सूर्ये संपन्नः । यथा पादोदरस्त्वचा विनिर्भुच्यत एवं ह वै स पाप्मना विनिर्भुक्तः स सामभिः उन्नीयते ब्रह्मलोकं स एतस्मात् जीवघनात् परात्परं पुरिशयं पुरुषमीक्षते । तदेतौ श्लोकौ भवतः ॥ ५ ॥*

पूर्ण मंत्र तो ॐकाराचा, उच्चारी जो श्रद्धेने |

मनी कामना धरुनी भौतिक, संपन्नचि व्हावे ज्ञाने || ३६.

त्याशी भौतिक ज्ञानी कांही, कठीण जीवनी कांही नसे |

सरस्वती जणु प्रसन्न त्याला, ऐसे ज्ञानही लाभतसे || ३७.

ज्ञाना संगे सहजी लाभती, सुखेही भौतिक ती त्याशी |

जगती प्रसिद्धी, सन्मानही तो, उणीव नाही द्रव्याशी || ३८.

जणु लाभला स्वर्ग तयाला, इथेच इहलोकी या |

अंती सुद्धा उत्तम गती त्या, उपासना जाई न वाया || ३९.

जसा सर्प टाकुनि कात ती, पुन्हाचि तेजे सळसळतो |

तैसे नवजीवन जणु लाभे, सदा यशस्वीच होतो || ४०.

सकाम ही जी उपासना ती, इहलोकी सौख्या देई |

मरणानंतर पुन्हा मानवी, जन्मचि इहलोकी घेई || ४१.

अपूर्व ज्ञानाची त्या प्राप्ती, उणीव सौख्याची नाही |

प्रश्न सुटती ते इहलोकीचे, अनुकूल दैवही त्या होई || ४२

जीही कामना मनी असे त्या, त्याची पूर्तता ॐकारे |

सरते ना ते जाणे येणे, उघडती नच मुक्ती द्वारे || ४३.

उपासना गोचर ॐ ची ही, परि स्वार्थाने भरलेली |

मिथ्या इथले, त्याची कामना, जगी वाहवा जरी झाली || ४४.

म्हणुनि कनिष्ठचि उपासना ही, अगदी जवळी परब्रह्म असे |

परि इच्छिता कल्पनेतले, सौख्य तया ते लाभतसे ||४५.

*तिस्रो मात्रा मृत्युमत्यः प्रयुक्ता अन्योन्यसक्ताः अनविप्रयुक्ताः।*

*क्रियासु बाह्याभ्यन्तरमध्यमासु सम्यक् प्रयुक्तासु न कम्पते ज्ञः॥६॥*

उच्चारी तो पूर्णचि ॐ जरि, इच्छीत फली इच्छापूर्ती |

पुन्हा घडे ते येणे जाणे, तयाशी लाभे ना मुक्ती || ४६.

उच्चारणी ना शब्द वेगळे 'अ, उ वा ते म' ऐसे |

पूर्ण ॐ असे, करी उच्चारण, कामनाची जरि मनी वसे || ४७.

येथं न उच्चारण मात्रांचे, परंतु ते ॐकाराचे |

फलित वेगळे अवस्था त्रयी, समजुनी ते सांगायाचे || ४८.

पूर्णचि ॐकारा उच्चारी, विना कामना श्रद्धेने |

मनी लालसा परब्रह्माची, जिंकियले मरणा तेणे || ४९.

राज मंत्र हा, द्वारी नेई, प्रत्यक्षची परब्रह्माच्या |

जेथे संपती ध्वनी नि कंपने, सहजी विसावे शांतीच्या || ५०.

समरसता ती पूर्ण तेथं ती, जोवरी नादाच्या संगे |

नादामागुती, समरस कंपनी, संपताही लक्ष न भंगे || ५१.

ॐकाराचा गोचर ध्वनी तो, वाहन जैसे ते नेई |

उतरे तेथे सोडी वाहन, प्रांत शांतीचा तो येई || ५२

अनुभूती तिजला, ध्यानी धरावे, अद्वैताची दिव्य स्थिती |
सदाचि समरस तिचिया माजी, कुठे तेधवा ना गुंती || ५३.

इहलोकी प्रारब्धी उरले, जीवन जाई सौख्याने |
सहजी दिसे त्या पथ उन्नतीचा, मळे कदापि न द्वैताने || ५४.

संसारी करी, विहीत कर्मे, परि ना गुंते तो कोठे |
लक्ष तयाचे नित्यचि ब्रह्मी, इहलोकीचे चक्र सुटे || ५५.

ब्राह्मीस्थिती ती तयाशी लाभे, दुर्लभ जी कि देवांना |
नित्य राही तो अद्वैतातचि, दिसे न कांही ब्रह्मविना || ५६.

एक एक मात्रेच्या योगे, तिन्ही अवस्था देहाच्या |
यांना उल्लंघुनी जातसे, निकट जातसे ब्रह्माच्या || ५७.

अमात्राचि म्हणती चवथी जी, जेथे उच्चारण नाही |
ॐकाराच्या अंती नाद नि, ध्वनी-सहित ते कंपनही || ५८.

सारे विरते, ये अनुभूती, केवळ नीरव शांतीची |
देहभान ते सहजी नुरते, स्थिती येत जणु शुन्याची || ५९.

जेथे कांही नसे कामना, पूर्णकाम सहजी होई |
त्याशी नाही कांही लाभणे, तोचि असे सारे कांही || ६०.

अद्वैती त्या, समदृष्टीने सकल वासुदेव पाही |

आप नि परके भावचि नुरला, भास जगाचा तो नाही || ६१.

सर्वव्यापी नि सर्वज्ञानी, ब्रह्म असे जे तोचि स्वये |

तेथे पाही साक्षीभावे, विचलित ना त्याने होये || ६२.

बाह्य तसे अंतरी चहूंकडे, एकच होई अनुभूती |

स्वये सौख्य तो, नित्य निरंतर, प्रतीत होई ब्राह्मीस्थिती || ६३.

जोवरी जीवन तोवरी जगती, कार्ये करी तो, निष्कामे |

अनासक्त ती सदैव वृत्ती, अंतरी परि ब्रह्मात रमे || ६४.

नित्य येत जागृती तेधवा, जरि झोपे तो, सावधची |

विचलित ना तो कदा मानसी, नित्य अवस्था शांतीची || ६५.

जीवन जोवरी स्थिती न सारखी, खेळ पाही तो मौजेने |

देह विचरतो जगतामाजी, सिद्ध न विचलित हो तेणे || ६६.

*ऋग्भिरेतं यजुर्भिरन्तरिक्षं सामभिर्यत् तत् कवयो वेदयन्ते ।*

*तं ओङ्कारेण एव*

*आयतनेन अन्वेति विद्वान् यत्तच्छान्तं अजरं अमृतं अभयं परं चेति ॥ ७ ॥*

सकाम उपासना मात्रांची, पहिली निगडित पृथ्वीशी |
दुजी अंतरिक्षाला जोडी, तिसरी आणि स्वर्गाशी || ६७.

प्रथम जागृती दुजी स्वप्नी नि, तिसरी अवस्था सुषुप्तीशी |
भौतिक, अंतरीक्ष त्या लोकी, आणि उच्च त्या लोकाशी || ६८.

भौतिक सुख लाभ ही जेधवा, ॐकाराने मिळण्याशी |
तशी कामना मनी धरोनी, करणे ते उच्चाराशी || ६९.

पूर्ण ब्रह्मचि परि लाभण्या, नच उच्चारण ते व्हावे |
चिदाकाशी ते ध्यान ठेऊनी, ॐकाराला ऐकावे || ७०.

शून्य मानसी, लक्ष भृ-मध्यी, सहस्त्रो ऋषी म्हणताती |
श्रवणी यावे ते उच्चारण, समरसता अनुभुत पुरती || ७१.

नाद कंपने विरता आपण, त्यासंगे शून्यी जावे |
सहजी समरस ब्रह्मी व्हावे, मीपण पुरते विसरावे || ७२.

**पूर्णचि लयासहित जेधवा, समरस होई ब्रह्माशी |**

**आनंदाला येई भरती, ब्राह्मीस्थिती लाभता अशी || ७३.**

**ब्रह्मी मिसळता, पूर्णची निर्भय, सर्वज्ञ नि शांत सदा |**

**चिरंजीवता नित्य अनुभवी, विचलित नच तो होई कदा || ७४.**

**विरती अवस्था, जरा, व्याधी नि, सुख-दुःखाच्या पैल सदा |**

**चैतन्याशी सदाही निगडीत, नीरव शांती नि आनंदा || ७५.**

**पाचवा प्रश्न संपला.**

# प्रश्न सहावा

ॐकाराच्या प्रगल्भतेचे दर्शन होता, तृप्त जाहले साही ऋषि |

गुरुमुखे ते गुह्य ऐकिले, करणे ब्रह्मप्राप्ती कशी || १.

भारद्वाजाचा सुपुत्र जो, नाम सुकेशा तो उठला |

विनम्र वंदन करूनि गुरूला, अनुमती मागे प्रश्नाला || २.

प्रसन्न चित्ते पिप्पलाद ते, विचारी शंका हे, म्हणती |

आनंदाने आचार्यांना सुकेशा म्हणे गुरुप्रती || ३.

*अथ हैनं सुकेशा भारद्वाजः पप्रच्छ । भगवन् हिरण्यनाभः*
*कौसल्यो राजपुत्रो*
*मामुपेत्यैतं प्रश्नमपृच्छत ।*
*षोडशकलं भारद्वाज ! पुरुषं वेत्थ ? तमहं कुमारं*
*अब्रुवं नाहमिमं वेद ।*
*यदि अहमिममवेदिषं कथं ते नावक्ष्यमिति ।*
*समूलो*
*वा एष परिशुष्यति योऽनृतमभिवदति तस्मान्नार्हम्यनृतं वक्तुम्।*
*स तूष्णीं रथमारुह्य प्रवव्राज ।*
*तं त्वा पृच्छामि क्वासौ पुरुष इति ॥ १ ॥*

**नामे हिरण्यनाभ जयाचे, राजकुमारची कोसलचा |**
**एके दिवशी मला भेटुनी, प्रश्न विचारी मज त्याचा || ४.**
**षोडश असती कला जयाला, पुरुष असा तो कोण असे ?|**
**"नाहीच माहित मला म्हणोनी", त्याशी सांगितले तैसे ||५.**
**कृपा करोनी मज सांगावे, कोण पुरुष हा दिव्य असे ?|**
**अज्ञाना मम दूर करावे आपणाशी मी विनवितसे || ६.**

*तस्मै स होवाच ।*

*इह एवान्त:शरीरे सोभ्य स पुरुषो यस्मिन् एता: षोडशकला: प्रभवन्तीति ॥ २ ॥*

महर्षी वदती, नीट ऐक तूं, नच शोधावा लागे तो |
स्वये पुरुष तो, हृदयी सुकेशा, आपुल्याचि परमात्मा तो || ७.
विश्वाला म्हणती 'षोडशकल,' विश्व कार्य हे जगताचे |
निघे जगत हे ब्रह्मापासुनि, आणि स्थान तेच परतायाचे || ८.
ब्रह्मालाचि पुरुष हि म्हणती, सोळा भागी विश्व रची |
याची देही करी ते वसती, गूढ अंतरी गुहेतची || ९.
सृजन जाहल्या, कलाही षोडश, देहामाजी या असता |
वसे देही तो, जगत चालवी, तोचि असे आश्रयदाता || १०.

*स ईक्षांचक्रे ।*

*कस्मिन् अहमुत्क्रान्त उत्क्रान्तो भविष्यामि कस्मिन्वा प्रतिष्ठिते प्रतिष्ठस्यामीति ॥ ३ ॥*

**नव निर्मितीचा सुकाल येता, अखिल सृष्टीला निर्माया |**

**जाणीव यावी मम सत्तेची, स्थान हवे ते शोधाया ||११.**

**विचार त्याने ऐसा केला, साक्षी राहणे त्या ठायी |**

**कवण स्थान ते निवडु ऐसे, ते राही, तर मी राही || १२**

**प्रयाण त्याने जेंव्हा करिता, पडेन मीही बाहेरी |**

**तेथे असता, माझी सत्ता, गोचर व्हावी ती सारी || १३.**

**शरीर सचेतन, ब्रह्महि तैसे, निवड योग्यचि ब्रह्माची |**

**प्राण तत्व ते सुयोग्य ऐसे, पूर्ण चेतना माझीची || १४.**

*स प्राणं असृजत प्राणात् श्रद्धां खं वायुर्ज्योतिराप: पृथिवीन्द्रियं मन: ।*

*अन्नं अन्नाद्वीर्यं तपो मन्त्रा: कर्मलोका लोकेषु च नाम ॥४॥*

तये निर्मिला आधी प्राण तो, नंतर सारी पंच भुते |

तसेची मन ते आणि इंद्रिये, तसे निर्मिले अन्नाते || १५.

अन्नी ठेविले वीर्य तसेची, तप मंत्र नि ते कर्मांते |

कर्मी लाविले फलहि त्याचे, नाम आणखी रूपांते || १६.

लोकी सहजी नियम लाविला, जैसा हेतू कर्माचा |

तैशी सहजी गती मिळे ती, नियमची केला चक्राचा || १७

प्राण नि श्रद्धा पंचभुतेही, अन्न इंद्रिये वीर्यहि ते |

मन नि लोकहि नाम नि तैसी, कर्मे मंत्र त्या सोळाते || १८.

प्राणाशी ते प्रधान नेमी, श्रद्धा साहाय्या ठेवियली |

इतरा नेमी आपुल्या स्थानी, रचना विश्वाची झाली || १९.

जे पिंडी ब्रह्मांडी तेचि, देह विलक्षण ऐसाही |

स्वये प्रतिष्ठे तो त्या माजी, द्वैताचा खेळचि पाही || २०.

इहलोक हा रचिला ऐसा, नियमन आपैसे होई |

ईश्वर साक्षी, नित्य अलिप्तचि, कौतुक ते त्याचे पाही || २१.

*स यथेमा नद्यः स्यन्दमानाः समुद्रायणाः समुद्रं प्राप्याः तं गच्छन्ति भिद्येते तासां नामरुपे*

*समुद्र इत्येवं प्रोच्यते ।*

*एवमेवास्य परिद्रष्टुरिमाः षोडशकलाः पुरुषायणाः पुरुषं प्राप्यास्त गच्छन्ति भिद्येते चासां नामरूपे पुरुष*

*इत्येवं प्रोच्यते स एषोऽकलोऽमृतो भवति तदेष श्लोकः॥५॥*

**जैशा सरिता, धावती सहजी, सागराशी त्या मिळण्याला |**

**आणि त्याशी पावती लया, केवळ सागर होण्याला ||२२.**

**नाम रूपे आपुली त्यागिती, ना गंगा ना भागीरथी |**

**तशा कला त्या पूर्णहि सोळा, ब्रह्मा एकरूप होती || २३.**

**ज्ञान जेही हे जोही जाणतो, चिरंजीवचि तो होई |**

**मिळे सहजी तो ब्रह्मालागी, त्याशी मृत्यू भय नाही || २४.**

*अरा इव रथनाभौ कला यस्मिन् प्रतिष्ठिताः ।*

*तं वेद्यं पुरुषं वेद यथा मा वो मृत्युः परिव्यथा इति ॥ ६ ॥*

**रथचक्राच्या आसाला ते, आरे असती जोडीयले |**

**तशा प्रतिष्ठित असती कला त्या, ब्रह्मा ऐसे जाणी भले || २५.**

**परम पुरुष तो असा अवतरे, नाभी स्वयेचि तो राही |**

**यथार्थ ज्याने ब्रह्म जाणिले, त्याशी मृत्यू भय नाही || २६.**

**परम श्रेष्ठचि ज्ञान असे ते, जया जाणता, पुर्णत्वा |**

**ज्ञानी सर्वज्ञचि जाहला, ज्ञानी नच कांही उणीवा || २७.**

*तान् होवाच - एतावदेव अहं एतत् परं ब्रह्म वेद ।*

*नातः परमस्तीति ॥ ७ ॥*

**महर्षी ऐसे सारे बोलुनी, म्हणती साऱ्या शिष्यांशी |**

**होते मजला विदितचि जे जे, प्रकटलिये मी आपणाशी || २८.**

**ब्रह्मज्ञाना आपणा दिधले, कांही गुह्य ना मजपाशी |**

**भाग्यवान ते आपण सारे, उमजे तेही तुम्हाशी || २९.**

*ते तमर्चयन्तः त्वं हि नः पिता योऽस्माकं अविद्यायाः*

*परं पारं तारयसीति ।*

*नमः परमऋषिभ्यो नमः परमऋषिभ्यः ॥ ८ ॥*

**तृप्त जाहले सकलचि ऋषि ते, ऐकुनी दिव्यचि ज्ञानाशी |**

**स्तब्ध जाहले कृतार्थतेने, नम्र वंदियले त्याशी || ३०.**

**म्हणती त्यांना पिताची आपण, गुह्य स्पष्टचि सांगितले |**

**काळोखी ती अज्ञानाची पैलचि आम्हाशी नेले || ३१.**

**ज्ञान मूर्ती ते श्रेष्ठचि आपण, सत्संगचि आम्हा दिधला |**

**दिधले अमृतमयचि ज्ञान ते, पूर्णचि संतोषही झाला || ३२.**

**आदर भावे पूजन केले, साष्टांगे झाले ते नमिते |**

**श्रेष्ठ ज्ञान ते अपूर्व दिधले, कैसे फेडावे ऋण ते || ५३.**

**अध्याय सहावा आणि उपनिषद काव्यमय भाष्य समाप्त**

|| हरी ॐ ||

# या उपनिषदाचे सार

{“उपनिषदे’ या नेट वरील मालिकेवरील श्री. शरद यांच्या माहितीच्या सादर आधारे}

प्रश्नोपनिषद हे दशोपनिषदातील असून सृष्टीच्या मूलस्थानापासून परमात्म्याच्या स्वरूपापर्यंतच्या अनेक समस्यांचा उलगडा करणारे एक महत्वाचे उपनिषद आहे.

हे अथर्ववेदाच्या पिप्पलाद शाखेचे उपनिषद असून प्रणेते महर्षी पिप्पलादच आहेत.

महर्षी पिप्पलादांकडे आलेल्या सहा शिष्यांचे प्रश्न व त्यांची उत्तरे असे याचे स्वरूप आहे. "प्रश्नोत्तररूपी उपनिषद" म्हणून "प्रश्न उपनिषद" हे नाव. हे गद्य उपनिषद असून मंत्रांना "वाक्य" म्हणून ओळखले जाते.

तत्वज्ञान

उपनिषदात खालील विषय हाताळलेले आहेत.

(१) ब्रह्म आणि द्वंदाची उत्पत्ती.

(२) प्राणाचे महत्व.

(३) निद्रा आणि स्वप्नमीमांसा.

(४) गाढ झोप म्हणजे ब्रह्मानंद.

(५) ॐकार ध्यानाने पापमुक्ती.

(६) लिंग शरीरकल्पना.

(७) अद्वैतपूर्ण अमरत्ववाद.

(८) "माया" म्हणजे "भास".

आता उपनिषदाकडे वळू.

सुकेश, सत्यकाम, सौर्यायणी, कौसल्य, भार्गव व कात्यायन हे सहा आचार्य ’परब्रह्म" जाणून घेण्याच्या इच्छेने हातात समिधा घेऊन शिष्यभावाने भगवान पिप्पलादांना शरण गेले.

महर्षी पिप्पलादांनी एक वर्ष आपल्या आश्रमात ब्रह्मचर्य व्रताने राहण्यास सांगितले व "मग प्रश्न विचारा मला माहीत असेल तर मी उत्तर सांगेन" असे सांगितले. त्याप्रमाणे पूर्व तयारी झाल्यावर एकेक ऋषि प्रश्न विचारू लागले आणि महर्षी उत्तर देऊ लागले.

प्रश्न १

कात्यायनाने प्रश्न विचारला, "हे भगवन, हे सर्व जीव कोणापासून निर्माण होतात ? "

हा जीव-जडात्मक संसार अनित्य आहे हे कळले तरी त्याला निर्माण कोणी केले हा प्रश्न आहे. जीवापासून जड किंवा जडापासून जीव निर्माण होवू शकत नाही हे सहज कळतेच मग हे भिन्न भिन्न निर्माण केले तरी कोणी ? भगवान पिप्पलाद उत्तर देतात ;

"प्रजापतीने तप केले व मग रयि व प्राण ही जोडी निर्माण केली. रयि म्हणजे अन्न व प्राण म्हणजे अग्नी (भोक्ता). प्रजापति म्हणजे आपण सर्वसाधारणपणे ब्रह्मदेव म्हणतो तो.थोडक्यात "निर्माता".पिप्पलाद यांनी पुढे अनेक द्वंदे दिली आहेत. उदा. आदित्य=प्राण तर चंद्र =रयि. देवयान प्राण तर पितृयान रयि भोक्ता असतो दिवस=प्राण तर रात्र= रयि, वगैरे थोडक्यात ऊत्तर :"चेतन व अचेतन वस्तुंच्या मिश्रणातून सृष्टी निर्माण झाली व या उभय गोष्टीच सृष्टीचे मूलभूत तत्व होत."

(१) प्रजापतीने सृष्टी निर्माण केली ही "पौरुषेय" उपपत्ती झाली.

(२) तैत्तिरीय उपनिषदातही सृष्टीकर्त्याने तप करून मग द्वंदे ( निरुक्त-अनिरुक्त, विज्ञान-अविज्ञान, सत्य-अनृत,) निर्माण केली असेच म्हटले आहे पण ती द्वंदे (दिवस व रात्र, पितृयान-देवयान,सूर्य व चंद्र यापेक्षा) जास्त संयुक्तिक वाटतात.

प्रश्न २

भार्गव विचारतो, "भगवन्, किती देव प्रजेचे धारण करतात ? लोकांना प्रेरणा कोण देते ? त्यातील वरिष्ठ कोण ? "

पिप्पलाद यांनी तात्विक उत्तर दिले आहे. ते एका गोष्टीने सुरवात करतात. ते म्हणतात

" आकाश, वायू, अग्नि, जल, व पृथ्वी ही महाभूते व वाचा, मन, चक्षू व श्रोत्र ही इंद्रिये हेही देवच आहेत. ते देव प्रगट होऊन एकदा भांडण

करू लागले की, आम्हीच हे शरीर धारण करतो. त्या इंद्रियांना श्रेष्ठ देव प्राण म्हणाला, " असे समजण्याचा वेडेपणा करू नका. मी स्वत:ला पाच प्रकारे विभागून या शरीराला बळक्टी आणतो." पण त्यांचा विश्वास बसला नाही.

तेव्हा प्राण शरीर सोडून निघाल्यासारखा झाला. प्राण बाहेर पडू लागताच डोळे वगैरे इंद्रिये निस्तेज झाली. मधाच्या पोळ्यातील राणी मक्षिका बाहेर पडताच सर्व मक्षिका बाहेर पडतात, तद्वत प्राण बाहेर पडताच शरीराची स्थिती झाली. तेव्हा वाचा, मन इत्यादि.सर्वांनी प्राणाचे श्रेष्ठत्व मान्य केले. त्यांनी प्राणाचे खालील प्रकारे स्तवन केले.

हा प्राण सूर्य, पर्जन्य, इंद्र, वायू, पृथ्वी, रयि म्हनजे अन्न, सत् व असत्, अमृत आहे. रथचक्रात आरे एकजीव झालेले असतात, तद्वत प्राणात सर्व इंद्रिये एकत्र झालेली आहेत. चारी वेद, सर्व प्राणामध्ये प्रतिष्ठित आहेत. तूच इंद्र, रुद्र, तेजोनिधी सूर्य आहेस. त्रैलोक्य प्राणाधीन आहे. आईप्रमाणे तू आमचे पालन कर.आम्हाला लक्ष्मी व बुद्धी दे.".

भार्गवाच्या तीनही प्रश्नांचे उत्तर "प्राण".असे आहे..

प्राणाचे श्रेष्ठत्व सांगणारी कथा छांदोग्य व कौषीतकि उपनिषदांमध्येही दिली आहे. तेथे एकेक इंद्रिय वर्षभर शरीराला सोडून गेले तरी शरीराचे कार्य चालूच राहिले. डोळे नसले तरी आंधळा जगू शकतोच. पण प्राण बाहेर जाऊ लागल्यावर सर्व इंद्रिये निर्जीव झाली.

अशी कथा दिली आहे. पण येथे इंद्रियांबरोबर पंचमहाभूतेही समाविष्ठ केली आहेत.

प्राण हा केवळ इंद्रियांचाच राजा नसून तो विश्वातील सर्व देवतांचा अधिपती आहे हे या उपनिषदाने स्पष्ट केले आहे.

प्रश्न ३

कौसल्य विचारतो, "भगवन्, हा प्राण कसा निर्माण होतो ? या शरीरात कसा येतो ? शरीरात विभागून कसा राहतो ? याचे बाह्य व अध्यात्म रूप कसे आहे ? "

प्राणाचे महत्त्व कळले, तो विश्वाचा आधार आहे हे ही कळले पण माझा प्राणाचा संबंध केव्हा येतो ? तो माझ्या शरीरात असतो, तेव्हा. आता कौसल्याला शरीर-प्राण संबंध जाणून घ्यावयाचा आहे.

भगवन पिप्पलाद म्हणतात, "फार खोलातील प्रश्न विचारलास, पण तू मोठा ज्ञाता आहेस म्हणून मी उत्तर देतो.

हा प्राण आत्म्यापासून निर्माण होतो.माणसाच्या सावलीप्रमाणे मानसाच्या शरीरात प्राण व्यापलेला आहे. इच्छेने शरीरात प्रान येतो.

राजा अधिकारी नेमतो, त्याप्रमाणे प्राण नेत्रादि इंद्रियांची नेमणुक करतो.

गुद व जननेंद्रियाचे ठिकाणी "अपान", मध्ये "समान" व नाक व मुखनासिका येथे प्राण स्वत: राहतो. "व्यान" बहात्तर हजार नाड्यांमध्ये

राहतो. यांमध्ये एक ऊर्ध्वगामी नाडी आहे त्यात ’उदान" प्राण असतो. तुमच्या पापपुण्याप्रंमाणे तो पापलोकात वा पुण्यलोकात जातो.पुंय-पाप समान असेल तर मनुष्यलोकाला जातो. आदित्य रूपाने बाह्य प्राण जगवतो. तो "समान" डोळयाच्या द्वारा सर्व सृष्टी पाहतो. ’समान" "व्यान"शी जोडलेला आहे. तेज म्हणजे "उदान" ते नष्ट झाले की माणुस मरणोन्मुख होतो.. ज्या अंतिम विचाराने जीव मृत्यू पावतो, त्याच विचाराने जीव पुनर्जन्म घेतो. उत्पत्ती, संकल्प, स्थाने व व्यापकत्व आदि प्रकारचे प्राणाचे आध्यात्मिक स्वरूप जाणून जीवात्मा अमर होतो

कौसल्याने एका प्रश्नात चार प्रश्न विचारले आहेत. प्राण आत्म्यापासून निर्माण होतो हे फार महत्वाचे. आपण नेहमी ’पंचप्राण" म्हणतो त्यांची स्थाने व कामे येथे सांगितली आहेत.

प्रश्न ४

सौर्यायणी गार्ग्य विचारतो, "भगवन्, ह्या पुरुषात (देहात) कोणती इंद्रिये झोपतात ? कोणती कार्य करतात ? कोण देव (इंद्रिय) स्वप्न पहातो ? सुख कुणाला मिळते ? आणि ही सर्व कोणाच्या अधिष्ठानावर आहेत ? "

इंद्रिये विश्रांती घेतात तर पहातो कोण ? कसे ? गाढ झोपेत मला स्वप्न पडत नाहीत, मग त्यावेळी स्वप्न "पहाणारा" काय करतो ? दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरात पिप्पलादांनी देव व इंद्रिये यांची सांगड घातली होती, ती ध्यानात ठेऊन गार्ग्य विचारत आहे कोणता देव काय करतो, काय

करत नाही, आणि ही स्वप्ने पहातो तरी कोण ? स्वप्नात माझी इंद्रिये कार्य करत नाहीत, मग हे सुख कोणाला मिळते ? आणि हे जे काय चालते ते कोणाच्या जोरावर ?

पिप्पलाद उत्तर देतात

"अस्ताला जाणाऱ्या सूर्याचे किरण त्याच्यातच विलीन होतात त्याप्रमाणे जेव्हा मनुष्य ऐकत नाही, बोलत नाही, पाहत नाही... त्यावेळी तो झोपला असे म्हणतात. त्याची इंद्रिये त्याच्या मनात लीन झालेली असतात. तेव्हा फक्त प्राणाग्नी जागृत असतात. अपान प्राण हा गार्ह्यपत्य अग्नी, व्यान हा अन्याहार्यपचन अग्नी, श्वासोच्छवासरूपी आहुती हा समान प्राण असून मन हे यजमान असते..त्याला प्राप्त होणारे इष्ट फल हा उदान प्राण होय.

तोच मनाला झोपेत ब्रह्मस्वरूप प्रतीत होतो. गाढ झोपेत सुषुप्ती अवस्थेत स्वप्न पडत नाहीत, तेव्हा तो केवळ सुख अनुभवतो.

पक्षी सायंकाळी आपल्या घरट्यात एकरूप होतात तद्वत इंद्रियसमूह झोपेत आत्म्यात विलीन होतात. पंचमहाभूते, ज्ञानेंद्रिये, कर्णेद्रिये, मन बुद्धी, अहंकार चित्त, तेज व प्राण हे सर्व आत्म्यात विलीन होतात हा ज्ञाता, कर्ता व विज्ञानस्वरूप पुरुष निद्रेत आत्म्यामध्ये विलीन होतो. दोषरहित, अशरीर, गुणरहित, शुभ्र असे जे आहे ते तो जानतो, परब्रह्मरूपाला प्राप्त होतो. तो अक्षरब्रह्म जाणतो.

गाढ झोपेत माणुस ब्रह्माच्या अगदी जवळ असतो पण हे अज्ञानाची अवस्था असल्याने असला तरी त्यास त्याची आणीव नसते. थोडक्यात, झोपेत सर्व इंद्रिये मनात विलीन होतात. प्राण जागा असतो. मन इंद्रियांचे काम करते. गाढ झोपेत मन आनंद अनुभवते.

प्रश्न ५.

सत्यकाम पिप्पलादांना विचारतो, " भगवन्, जो मनुष्य मरणापर्यंत ॐकाराचे ध्यान करतो त्याला कोणता लोक मिळतो ?"

उत्तर सरळ व थोडक्यात आहे.

" ॐकार हे पर व अपर ब्रह्म आहे. त्यानेच ज्ञाता त्यापैकी एक मिळवतो. ॐकाराच्या गोचर मात्रा तीन; अ,उ,म आणि चवथी उच्चारण संपल्यावर कंपने विरविणारी शांतिच्या अनुभूतीकडे नेणारी ‘अमात्रा’

जर सकाम भावनेने "एकमात्रक" ॐकाराचे ध्यान करील तर त्याला मनुष्यलोक प्राप्त होतो. त्याला ऋग्वेद, (तप, ब्रह्मचर्य व श्रद्धा यांच्या योगाने) माहात्म्य प्राप्त करून देतो.

तो जर सकाम "द्विमात्रक" ॐकाराचे ध्यान करील तर सोमलोकाला जाऊन तेथे ऐश्वर्य भोगून तो परत मनुष्यलोकास येतो.

जो कोणी सकाम "त्रिमात्रक" ॐकाराचे ध्यान करतो तो तेजस्वी सूर्यलोकास जातो. पापमुक्त झाल्याने सोमवेद त्याला ब्रह्मलोकाला घेऊन जातो. व इहलोकी परत येतो.

मात्र निष्काम भावनेने केलेल्या ॐकाराच्या साह्याने ज्ञात्याला शांत, अजर, अमृत, अभय, व परब्रह्म मिळते. ॐकाराच्या पूर्ण तात्विक विवेचानासाठी मांडूक्य-कारिका हे आचार्य गौडपाद यांच्या रचनेचा काव्यमय भाष्य हे ‘ हे साहित्य प्रतिष्ठान’ चे प्रकाशन अभ्यासावे.

प्रश्न ६

सुकेशाने पिप्पलादांना प्रश्न केला, " भगवन् , हिरण्यनाभ नावाच्या राजपुत्राने मला विचारले ’तू षोडषकलायुक्त पुरुष जाणतोस ?’ मी माहित नसल्याने उत्तर दिले नाही, तो प्रश्न मी तुम्हाला विचारतो. तो पुरुष कोठे आहे?"

पिप्पलाद सुकेशाला म्हणाले, " या शरीरातच तो पुरुष आहे. त्याच्या मध्ये षोडश कला आहेत. षोडश कला म्हणजे पंच प्राण, पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये व मन मिळून सोळा कला होतात)

परब्रह्माने विश्वनिर्मितीच्या वेळी देह निर्माण केला व मग तो विचार करू लागला, "या देहातून काय गेले असता मी जावे व काय राहिले असता मी रहावे ?"

त्याने प्राण निर्माण केला त्या प्राणापासून श्रद्धा, पंच महाभूते, दहा इंद्रिये, मन, अन्नापासून वीर्य, तप, मंत्र, लोक व लोकामध्ये नाम उत्पन्न झाले.

नद्या समुद्राला जाऊन मिळतात व नाहीशा होतात. त्यांचे नाम, रूप नाहिसे होते. त्या समुद्र नावानेच ओळखल्या जातात. त्या प्रमाणे मनुष्याच्या सोळा कला, मनुष्यशरीरात येऊन नष्ट होतात फक्त मनुष्य (पुरुष) म्हणून लोक त्यांना पुढे ओळखतात. हा "अकल" (सोळा कला रहित) अमृत होतो.

रथाच्या चाकात आरे असतात, त्याप्रमाणे सोळा कला असलेला पुरुष जो जाणतो, त्याला मृत्यूचे दु:ख होत नाही "

विश्वातल्या वस्तूंचे दोन विभाग. जड व चेतन. देह हा चेतन की जड ? जो पर्यंत देहात "प्राण" आहे तो पर्यंतच तो चेतन. नाही तर तो जडच. हा "प्राण"च "जीवा"ला "शीवा"ला जोडणारा दुवा आहे. हा प्राणच मनुष्याला "पुरुष" करतो. या पुरुषापासून सोळा कला निराळ्या करता येत नाहीत.

त्या समुद्राला मिळणाऱ्या नद्यांप्रमाणे पुरुषाबरोबर एकजीव होऊन जातात. छांदोग्य उपनिषदात हे निराळे उदाहरण देऊन स्पष्ट केले आहे. तेथे म्हटले आहे की मधमाश्यांनी निरनिराळ्या फुलातून गोळा केलेला रस एकदा पोळ्यात एकत्र केला की मग प्रत्येक रसाला निराळे अस्तित्व नसते. सगळे रस एक मध म्हणूनच ओळखले जातात. शंकराचार्य

यालाच "अद्वैत" म्हणतात जीवात्मा एकदा का परमात्म्याला भेटला की ते एकरूपच होतात.

पहिल्या उत्तरापासून सहाव्या उत्तरापर्यंत ’प्राणा"ची महिती सांगितली आहे.

अशा तऱ्हेने पर्याप्त ज्ञानाचा लाभ आल्यावर सर्व प्रश्न करते आचार्यांचे कृतज्ञ होऊन आचार्यांचे पूजन करतात. व हे उपनिषद येथे संपते.

या सर्वोच्च ज्ञानाच्या वाचन व आवश्यक आचरण करून आपण खरे सुखी व्हावे.

**प्रश्न उपनिषद सार संपूर्ण**

**आपणा सर्वातील शिव नित्य अनुभूत होत राहो.**

**‘पहा निजांगे शिव-ज्योतिर्लिंग’**

**ॐ शांतिः शांतिः शांतीः ||**

**||हरी ॐ||**

**-अण्णा**

**२३/०८/२०२१.{तृतीय श्रावणी सोमवार}**













अण्णा (श्री. मधुकर सोनवणे) यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके

क्लिक/टॅप करताच उघडतील




